सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

सेतू-अभ्यास

Bridge-Course

सातवी -मराठी

शैक्षणिक वर्ष २०२१-२२

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

ज्ञानसेवा तु साफल्यम्



- प्रवर्तक : शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
- प्रकाशक : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- प्रेरणा : **मा. वंदना कृष्णा**, (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- मार्गदर्शक : **मा.विशाल सोळंकी**, (भा.प्र.से.)
  आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  मा.राहुल द्विवेदी(भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- संपादक : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- सहसंपादक : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- कार्यकारी संपादक : **डॉ. कमलादेवी आवटे,** उपसंचालक (भाषा व समता विभाग)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  नीता जाधव, उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता, मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- संपादन सहाय्य : **डॉ. नंदा भोर, अश्विनी नरवणे,** विषय सहायक, मराठी विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- निर्मिती सदस्य : १) **श्री. नारायण मुदगलवाड**, अधिव्याख्याता (गट समन्वयक),
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, उस्मानाबाद.
  २) **श्रीम.दीपाली बाभूळकर**, विषय सहायक,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती.
  ३) **श्रीम.निशा काजवे**, विषय सहायक.
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर.
  ४) **श्रीम. शुभांगी मेथेपाटील,** विषय सहायक,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर.
  ५) **श्री.उदयकुमार कुऱ्हाडे**, शिक्षक,
  जिल्हा परिषद शाळा, बाळापूर(येवला),नाशिक.

अनक्रमणिका

क्रमांक	दिवस	क्षेत्र	पान नं.
१	पहिला	मौखिक भाषा विकास	७
२	दुसरा	मौखिक भाषा विकास	९
३	तिसरा	वाचन	११
४	चौथा	वाचन	११
५	पाचवा	लेखन	१३
६	सहावा	भाषाभ्यास	१५
७	सातवा	मौखिक भाषा विकास	१७
८	आठवा	लेखन	२०
९	नववा	भाषाभ्यास	२२
१०	दहावा	वाचन	२४
११	अकरावा	वाचन	२४
१२	बारावा	मौखिक भाषा विकास	२६
१३	तेरावा	लेखन	२८
१४	चौदावा	भाषाभ्यास	३०
१५	पंधरावा	चाचणी – १- गुण -१५	३२
१६	सोळावा	वाचन	३३
१७	सतरावा	वाचन	३३
१८	अठरावा	मौखिक भाषा विकास	३५
१९	एकोणिसावा	लेखन	३७
२०	विसावा	भाषाभ्यास	३९
२१	एकविसावा	मौखिक भाषा विकास	४१
२२	बाविसावा	भाषाभ्यास	४३
२३	तेविसावा	लेखन	४५
२४	चोविसावा	वाचन	४७
२५	पंचविसावा	वाचन	४७
२६	सव्विसावा	मौखिक भाषा विकास	४९
२७	सत्ताविसावा	मौखिक भाषा विकास	५१
२८	अट्ठाविसावा	भाषाभ्यास	५३
२९	एकोणतिसावा	लेखन	५५
३०	तिसावा	चाचणी –२- गुण -१५	५७
३१	एकतिसावा	भाषाभ्यास	५८
३२	बत्तिसावा	मौखिक भाषा विकास	६०
३३	तेहतिसावा	लेखन	६२
३४	चौतिसावा	लेखन	६४
३५	पस्तिसावा	भाषाभ्यास	६६
३६	छत्तिसावा	भाषाभ्यास	६६
३७	सदतिसावा	मौखिक भाषा विकास	६८
३८	अडतिसावा	वाचन	७०
३९	एकोणचाळीसावा	वाचन	७०
४०	चाळीसावा	लेखन	७२
४१	एकेचाळीसावा	लेखन	७४
४२	बेचाळीसावा	भाषाभ्यास	७६
४३	त्रेचाळीसावा	लेखन	७८
४४	चव्वेचाळीसावा	लेखन	८०
४५	पंचेचाळीसावा	चाचणी –३ गुण -३०	८२

विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो, मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंत. **या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला काही दिवस मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी व्हावी आणि या वर्षीच्या इयत्तेच्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हे उद्दिष्ट ठेवून तुमच्यासाठी हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू अभ्यास तुम्हाला मदत करणार आहे. हा सेतू अभ्यास दिवसनिहाय क्रमाने सोडवावा. यात दिवसनिहाय तयार केलेल्या कृतींचा समावेश आहे. तुम्ही दिलेल्या नियोजनाप्रमाणे कृती स्वप्रयत्नाने सोडवाव्यात. कृती सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत घ्या. सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून यामध्ये १५ व्या दिवशी पहिली ३० व्या दिवशी दुसरी व ४५ व्या दिवशी तिसरी याप्रमाणे तीन चाचण्यांचा समावेश आहे. दिलेल्या नियोजनानुसार येणाऱ्या चाचण्या सोडवा. चाचणी सोडवून झाल्यावर शिक्षकांकडून तपासून घ्या. चला सराव करू या व सक्षम बनू या यामधील कृती मध्ये अडचण आल्यास, न समजलेला किंवा अवघड वाटणारा भाग समजून घेण्यासाठी शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.

हा सेतू अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

शिक्षक / पालकांसाठी सूचना

कोविड १९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
- सदर अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सदर अभ्यासात क्षेत्र, कौशल्य, संकल्पना व अध्ययन निष्पत्ती / क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.
- संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी **'जाणून घेऊ या'**, त्या संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या',** मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** व मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याने आधी चिकित्सक विचार करावा, सर्जनशील व्हावे, अर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या विकासासाठी **'कल्पक होऊ या'** या सदरांचा समावेश केला आहे.
- संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून सर्वच कृतीमध्ये दीक्षा ॲप, क्यु आर कोड इ. ची मदत घ्यावी.

- मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.
- सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधी नंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू अभ्यास दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.
- चला सराव करू या हे सदर विद्यार्थ्यांनी स्वप्रयत्नाने सोडवावे याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.
- सदरील सेतू अभ्यास हा शिक्षकांसाठी असला तरीही शाळा ऑफलाइन सुरू नसल्याकारणाने याचा वापर करून पालक, शिक्षक मित्र यांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व पुढील इयत्तेत शिकावयाच्या कृतींची किंवा अभ्यासक्रमाची पूर्वतयारी घेऊ शकतील.
- या सेतू अभ्यासात दिलेल्या अध्ययन कृती या मार्गदर्शक असून शिक्षक आपल्या वर्गाच्या व विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांच्या अध्ययन संदर्भात इतर आवश्यक त्या कृती घेऊ शकतात.

सेतू अभ्यासच्या अंमलबजावणी व वापराकरिता आपणास हार्दिक शुभेच्छा!

पहिला दिवस

क्षेत्र –मौखिक भाषा विकास ,
कौशल्य- श्रवण , संभाषण

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- विविध प्रकारचे आवाज (उदा.पाऊस, वारा, रेल्वे , बस, फेरीवाला इत्यादी) ऐकण्याचा अनुभव, विविध पदार्थांच्या चवी इत्यादीबाबतचे अनुभव स्वतःच्या शब्दात सांगतात.
७ वी- वेगवेगळ्या स्थानिक, सामाजिक आणि भौगोलिक घटनांसंबंधी तर्कशुद्ध प्रतिक्रिया देतात. उदा.पावसाळ्यात सर्व परिसर हिरवागार होणे, याविषयी चर्चा करतात.

जाणून घेऊ या

- शिक्षकांनी पाऊस , वारा, रेल्वे, बस, फेरीवाला या सर्वांचे आवाज ऐकवावे. (इंटरनेट चा वापर करून किंवा अनुभव) या आवाजांविषयी काय वाटते ? कुठे आणि कधी ऐकायला मिळतात? अशाप्रकारे विद्यार्थ्यांशी चर्चा करावी .

ऐकूया आवाजाची गंमत -

(इंटरनेटद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षकांनी वेगवेगळे आवाज ऐकवावे .)

सक्षम बनू या

(विद्यार्थ्यांशी त्यांच्या अनुभवाशी संबंधित चर्चा करून घ्यावी.)

- आपल्या अवती- भोवती विविध प्रकारचे आवाज आपण ऐकत असतो, ते कोणकोणते आवाज असतात ? उदा.समजा तुम्ही बसस्थानकावर उभे आहात तर तुम्हाला कोणकोणते आवाज ऐकायला मिळतील ?

चला सराव करू या

- आवाजाशी संबंधित अनेक गाणी आपण ऐकतो जसे की **'किलबिल किलबिल पक्षी बोलती.....'**यासारखी आणखी कोणती गाणी विद्यार्थ्यांना सांगता येतील का हे विचारावे. तसेच ती गाणी म्हणून घ्यावीत.

कल्पक होऊ या

- विद्यार्थ्यांकडून आवाजदर्शक शब्द येणारी वाक्ये तयार करून घ्यावीत .
  उदा. पानांची सळसळ ऐकताच सर्वांचे लक्ष तिकडे गेले.

पूरक साहित्य स्त्रोत

- मोबाईल, लॅपटॉप इंटरनेटसहित, परिसरातील उपलब्ध वाद्य , आवाज करणारी साधने उदा. वाळलेल्या शेंगा.

दुसरा दिवस

क्षेत्र –मौखिक भाषा विकास ,
कौशल्य- श्रवण , संभाषण

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- पाहिलेल्या व ऐकलेल्या घटना (उदा.स्थानिक सामाजिक घटना, कार्यक्रम) यांविषयी न अडखळता बोलतात, प्रश्न विचारतात, मत मांडतात .

७ वी- मराठी भाषेमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य (उदा.बातमीपत्र, बातम्या, कथा, माहितीपर साहित्य, इंटरनेटवर प्रसारित होणारे साहित्य इत्यादी.) समजपूर्वक वाचतात व त्याबाबत आपली आवडनिवड लिखित स्वरूपात स्वतःचे विचार व्यक्त करतात.

जाणून घेऊ या

रेडेओहळ जंगलात टस्कराचा धुमाकूळ

कडगाव, ता. ३ : आजरा तालुक्यातून भुदरगडच्या डेळे-मेघोली वनहद्दीत चार दिवसांपूर्वी दाखल झालेला हत्ती आज पहाटे कोंडुशी, अंतुर्लीतून प्रवास करत शिवडाव येथील रेडेओहळ जंगलात दाखल झाला. येथील परिसरात टस्कर हत्तीने धुमाकूळ घातला आहे.

पिकांची नासधूस अधिक प्रमाणात झाली आहे. ऊस व अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. टस्कर रात्री ऊस शेतीतून जात असल्याने पिके जमीनदोस्त होत आहेत. या टस्कराचा वनविभागाने बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. चार दिवसांपूर्वी हत्तीने डेळे-भारमलवाडी जंगलात विश्रांती घेतली होती. त्यानंतर [illegible] भारमलवाडी, ढवरेपाटले,



शिवडाव : येथील शेतात हत्तीच्या पायाचे ठसे.

चाफेवाडी या जंगलातून पाळ्याचा हुडा व अनफ खुर्द या गावातून तांबाळे वीज वितरण कार्यालयाच्या दारातून कोंडुशी वनहद्दीत प्रवेश केला होता.

बुधवारी रात्री टस्कराने अंतुर्ली जंगलातून अधणी शुगर्स कारखान्याच्या साईटवर दाखल झाला. तेथील तारेचे कुंपण तोडून शिवडावच्या जंगलात गुरुवारी पहाटे पाचच्या सुमारास दाखल झाला. जंगलाशेजारी असलेल्या घनगरवाड्यावरील हेमंत धाकू खरात यांच्या घरातील दरवाजा सोंडेने ढकलला. त्यामुळे घरातील लोक घाबरले होते. त्यानंतर प्रमोद मोरेकर यांच्या शेतातील उसाचे नुकसान करत जंगलाच्या दिशेने निघून गेला. गेल्या वर्षी हत्तीने याच मार्गाने कोंडुशी जंगलातून पुढे वाकीघोल व त्या ही पुढे गगनबावडापर्यंत मजल मारली होती. या वेळी हत्ती याच मार्गे पुढे जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, हत्तीच्या मागावर वनरक्षक जॉन डिसोझा, वनमजूर तुकाराम लाड, मारुती गुरव, प्रकाश तेजम हत्तीच्या वावर असणाऱ्या शेतात रात्री शेतकऱ्यांनी जाऊ नये, असे वन विभागाने सांगितले.

हत्ती पाहण्यासाठी ग्रामस्थांची गर्दी

परिसरात गव्यांचा त्रास नेहमीच होत असल्याने शेतकरी रात्री पिकांच्या रखावलीसाठी रात्रभर शेतातच असतात. त्यांना हत्ती दिसला. हत्ती गावठाण येथील मराठी शाळेच्या शेजारून जात आहे, याची माहिती मिळताच लोकांनी हत्ती पाहण्यासाठी गर्दी केली होती.

- वृत्तपत्रामध्ये आलेल्या घटनेचे वाचन करून घ्यावे. या घटनेविषयी विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया जाणून घ्याव्यात.

सक्षम बनू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी त्यांच्या अनुभवाशी संबंधित चर्चा करावी .)

- तुमच्या आजूबाजूला कोणकोणत्या घटना किंवा कार्यक्रम होतात ?
  उदा. उद्घाटन, वृक्षारोपण, रक्तदान इत्यादी अनेक.
- अशा कार्यक्रमाना जायला तुम्हाला आवडते का ? कारण काय ?

चला सराव करू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी खाली दिलेल्या प्रश्नाद्वारे चर्चा करून घ्यावी .)

- तुमच्या परिसरामध्ये एक सार्वजनिक नळ आहे. तो बंद करण्यास लोक विसरतात तर तुम्ही काय कराल?

कल्पक होऊ या

(खालील मुद्द्यांवर गटामध्ये चर्चा करून घ्यावी .)

- समजा तुमच्या वर्गाकडे बालदिनाच्या कार्यक्रमाचे नियोजन दिले आहे, तर तुम्ही नियोजन करताना कोणत्या गोष्टींचा विचार कराल ते सांगा ?

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, वर्तमानपत्रातील कात्रणे, विविध कार्यक्रमाचे फोटो

तिसरा व चौथा दिवस

क्षेत्र – वाचन
कौशल्य – साहित्य प्रकारची जाण व त्यांचे प्रकटवाचन

अध्ययन निष्पत्ती – ६ वी- मराठी भाषेतील विविध साहित्यप्रकार (कथा,कविता,नाटक कादंबरी ,ललितलेख इ.) समजपर्वक वाचून चर्चा करतात.

जाणून घेऊ या

कृती - मराठी भाषेतील विविध साहित्यप्रकार जाणून घेऊन आदर्श प्रकटवाचन करणे.

कार्यपद्धती - मराठी भाषेत वाचण्यासाठी पाठ्यपुस्तकासोबत कोणकोणत्या प्रकारची साहित्य उपलब्ध आहेत ? हे साहित्यप्रकार कोठे उपलब्ध होतात? याची विद्यार्थ्यांसोबत चर्चा करावी. साहित्यप्रकारांची यादी बनवावी. यानंतर एखादे मासिक (किशोर) यातील मजकुराचे आदर्श प्रकटवाचन करून दाखवावे. यावेळी वाचनातील अचूकता, वाचलेल्या घटकाचे स्मरण आणि आकलन, वाचनातील सहजता आणि वाचलेलं दुसऱ्यापर्यंत पोहोचवणं या गोष्टीचे महत्त्व पटवून द्यावे.

सक्षम बनू या

कृती – वर्तमानपत्रातील घटना किंवा प्रसंग वाचून त्यातील घटना योग्य क्रमाने सांगणे.
कार्यपद्धती – खाली दिलेल्या व या सारख्या बातमीचे प्रकटवाचन करून घ्यावे व ते डोळ्यासमोरून बाजूला करून त्यातील घटना व प्रसंग योग्य क्रमाने विद्यार्थ्यांना सांगावयास लावावा.

अंधश्रद्धा निर्मूलन : काळाची गरज

रत्नागिरी,दि. २४ डिसेंबर : म. गांधी महाविद्यालयात दिनांक २३ डिसेंबर २०१९ रोजी विज्ञाननिष्ठ प्राध्यापक राहुल थोरात यांचे व्याख्यान झाले. अंधश्रद्धा निर्मूलन ही काळाची गरज आहे, या मुद्द्याचा त्यांनी सखोल उहापोह केला. लोकांच्या बऱ्याचशा समजूती या गैरसमजावर आधारित असतात, तर काही ठिकाणी समाजकंटक लोकांकडून फसवणूकही केली जाते, असे त्यांनी उदाहरणांसह पटवून दिले. एकविसाव्या शतकात आता वैद्यानिक दृष्टीकोन अंगीकारणे अत्यंत गरजेचे असून भारतीय समाजाची मानसिकता बदलायला हवी, असे त्यांनी आग्रहाने सांगितले. या व्याख्यानापूर्वी त्यांच्या सहकारी भोसले यांनी जादूचे प्रयोग करून दाखवले आणि जादूटोणा करणारे व बुवाबाजी करणारे लोकांच्या अंधश्रद्धेचा गैरफायदा कसा घेतात, ते सप्रमाण दाखवले. सुरुवातीला प्राचार्य श्री. बोरसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विद्यार्थी-प्रतिनिधी मयंक यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि प्रा. काळे यांनी आभार मानले. व्यख्यानाला विद्यार्थांची उपस्थिती मोठ्या प्रमाणवर होती. व्याख्यानंतर पाहुण्यांनी श्रोत्यांच्या प्रश्नांना मोकळेपणाने उत्तरे दिली.

चला सराव करू या

कृती - आपल्या आवडीचे साहित्याचे (कथा, कविता, पाठ, जाहिरात) समजपूर्वक वाचन करणे.
कार्यपद्धती - प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या आवडीचा साहित्य प्रकार निवडून त्यातील निश्चित मजकुराचे वाचन करावयास लावावे. वाचन वेग कमी असणाऱ्या मुलांना तुलनेत सोपा मजकूर वाचावयास द्यावा. त्याने जे वाचले त्याचा सार आपल्या शब्दात सांगावयास लावावा. जेणेकरून त्याचे आकलन समजून येईल. यावेळी वाचलेल्या मजकुरावर आधारित प्रश्न विचारावे. यात वस्तुनिष्ठ प्रश्न जसा की कोण? कोठे? कधी? कोणते? कोणाला? केव्हा? एखादाच असावा. मात्र का? कसे? तुला काय वाटते? का? यासारखे सखोल आकलन तपासणारे प्रश्न अधिक असावे.

कल्पक होऊ या

कृती – कात्रणांचा संग्रह व आपल्या गटात तिचे वाचन करणे.
कार्यपद्धती – ही कृती चार, पाच संख्येच्या गटात घ्यावी. वृत्तपत्रातील विविध लेख जसे की, गोष्टी, कविता, अन्नपदार्थ, फळे - फुले, क्रांतिकारक, राष्ट्रीय प्रतिके, याविषयीची माहितीचे कात्रण काढून त्याची चिकटपुस्तिका बनवा व आपल्या गटात तिचे प्रकटवाचन करा.

पूरक साहित्य स्रोत

गोष्टीची पुस्तके, स्थानिक वृत्तपत्रे- जाहिरात, बातमी, मासिके, कविता संग्रह, संवाद, निबंधमाला, आंतरजालावर प्रसिद्ध साहित्य, सहावीचे पाठ्यपुस्तक.

पाचवा
दिवस

क्षेत्र- लेखन
कौशल्य - अनुभव लेखन

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- इतरांनी सांगितलेले अनुभव आवश्यकतेनुसार लिहितात. उदा. सार्वजनिक ठिकाणी ऐकलेल्या गोष्टी/घटना लिहिणे उदा. चौक, बसस्थानक इ. ठिकाणावरील अनुभव.

जाणून घेऊ या



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. उदा. रेल्वे स्थानकावर/ बस स्थानकावर आपल्या मित्राला सोडायला आले असल्यास काय अनुभवायला आले ते लिहायला सांगावे.)

सक्षम बनू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलते करावे, विचार प्रवृत्त करावे. आपले विचार खालील विविध मुद्द्यांवर लिहण्याचा सराव द्यावा.)

- रेल्वे स्थानक परिसरात ऐकू येणाऱ्या, दिसणाऱ्या जाहिराती
- फेरीवाले व प्रवाश्यांची लगबग
- मित्राला निरोप देतानांचे संभाषण

(याप्रमाणे उपलब्ध इतर चित्रांचा वापर करून विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगून विविध मुद्द्यांवर लेखन करायला सांगावे. मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत चित्र असावे.)

चला सराव करू या

शिक्षकांनी बसस्थानक, रेल्वे स्थानकावर असणाऱ्या विविध प्रकारच्या सुविधा, आढळून आलेल्या विविध बाबींवर लेखनाचा सराव द्यावा.

कल्पक होऊ या

सूर्य सुट्टीवर गेला तर... या विषयावर विद्यार्थ्यांना कल्पना करून विचार लिहून काढायला सांगावेत.

पूरक साहित्य स्रोत

आंतरजाल, विविध प्रसंगचित्रे

सहावा
दिवस

क्षेत्र –भाषाभ्यास(व्याकरण),
कौशल्य- श्रवण , लेखन
संबोध - शब्दांच्या जाती- नामांचे प्रकार

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात
उदा. नामांचे प्रकार
७ वी-विविध विषय आणि उद्देशांसाठी लिहिताना इतर व्याकरणिक घटकांचा उपयोग करतात

जाणून घेऊ या

- **गोष्टीतील नामे ओळख.**

करीमचा प्रामाणिकपणा

करीम खूपच सरळमार्गी आणि प्रामाणिक, संस्कारी मुलगा होता. एकदा काही कारणाने तो शेजा-याच्या घरी गेला. शेजारी बाहेर गेले होते. करीमला बसायला सांगून नोकर निघून गेला. करीम जिथे बसला होता तिथे जवळ एका टोपलीत उत्तम दर्जाची सफरचंदे ठेवली होती. त्या मुलालाही सफरचंद खूप आवडत असत पण त्याने त्यांना हात लावला नाही. शेजारी येताच मुलाने उठून नमस्कार केला, शेजा-याने त्याला जवळ घेतले व विचारले,"तुला सफरचंद तर खूप आवडतात ना, मग तरीसुद्धा एकही सफरचंद उचलून का खाल्ले नाहीस?" मुलगा म्हणाला," इथे कोणीच नव्हते, सफरचंदे जरी उचलून घेतली असती तरी कुणालाच कळले नसते. कोणीच मला पहात नव्हते पण मी स्वत:ला ते पहात होतो. मी स्वत:ला फसवू शकत नाही." शेजा-यास त्याच्या या बोलण्याचा आनंद वाटला. त्याने त्याला शाबासकी दिली व म्हणाला, "आपण आपल्याला कधीच फसवू शकत नाही. दुस-याला लाख फसवू पण स्वत:शी खोटे बोलणे फार अवघड आहे. सर्वांनीच तुझ्यासारखे नम्रतेने व प्रामाणिकपणे वागले तर जग सुखी होईल."

(शिक्षकांनी वर्गात वरीलप्रमाणे गोष्ट सांगावी तसेच गोष्टीतील नामांची यादी विद्यार्थ्यांच्या मदतीने फळ्यावर लिहावी. विद्यार्थी सांगू न शकलेल्या नामांची स्वत: फळ्यावर नोंद करावी. तसेच नामाची व्याख्या व उदाहरणे यातील संबंध यावर थोडक्यात चर्चा घ्यावी. नामे ही वेगवेगळ्या प्रकारची असतात हे फक्त लक्षात आणून द्यावे.)


सक्षम बनू या


- **समजून घेऊ नामांचे प्रकार.**

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नामाचे तीन प्रकार, त्यांच्या व्याख्या व उदाहरणे समजावून सांगावेत. तसेच स्वत:च्या मार्गदर्शनाखाली वर सांगितलेल्या 'करीमचा प्रामाणिकपणा' या गोष्टीमधील नामांची सामान्यनाम, विशेषनाम व भाववाचकनाम या ३ प्रकारांमध्ये वर्गीकरण करून घ्यावे.)

चला सराव करू या

- **(शिक्षकांनी विद्यार्थ्याला कोणत्याही आवडत्या व्यक्तीचे व वस्तूचे नाम गोलात लिहून त्या व्यक्तीला व वस्तूला लागू पडणारी नामे बाजूने लिहिण्यास सांगावे. हे करताना नामाच्या तिन्ही प्रकारांची (सामान्यनाम, विशेषनाम व भाववाचकनाम)२-२ उदाहरणे येतील अशी नामे मांडण्यावर भर द्यावा.)**





- **विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकामधील एखादा पाठ / उपलब्ध लिखित मजकूरातील नामांची सामान्यनाम, विशेषनाम व भाववाचकनाम या प्रकारामध्ये वर्गीकरण करण्यास सांगावे.**

कल्पक होऊ या

- **शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नामांचे तिन्ही प्रकार एकाच वाक्यात येतील अशी २-२ वाक्ये प्रथम तोंडी नंतर लेखी स्वरूपात मांडण्यास सांगावे.**

पूरक साहित्य स्रोत


इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर.

सातवा दिवस

क्षेत्र –मौखिक भाषा विकास ,
कौशल्य- श्रवण , संभाषण

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टी / घटना /मुद्दे स्वतःच्या भाषेत कथन करतात, लिहितात.
उदा. अपूर्ण गोष्ट पूर्ण करणे,प्रसंगाचे वर्णन करणे.
७ वी- विविध संवेदनशील मुद्द्यांविषयी स्वतःचे तार्किक विचार तोंडी/लेखी स्वरूपात व्यक्त करतात.

जाणून घेऊ या



महत्त्व आईचे

एकदा एका व्यक्तीने स्वामी विवेकानंदांना प्रश्न विचारला, 'स्वामीजी, संसारामध्ये जेवढी आईची महती गायली जाते तेवढे महत्त्व पित्याला का दिले जात नाही? मातेइतकाच पितासुद्धा महत्त्वाचा असूनसुद्धा पित्याला फारसे का महत्त्व दिले जात नाही याचा कृपया उलगडा करावा.' स्वामीजी यावर काहीच बोलले नाही. ते त्या व्यक्तीपासून थोडे दूर गेले आणि एक मोठा दगड त्यांनी उचलला व त्या व्यक्तीच्या हाती देत ते म्हणाले, 'बंधू, हा दगड उद्या सकाळपासून तू पोटाला बांध आणि तुझी नित्यनेमाची सर्व कामे करत जा. तुझ्या प्रश्नाचे उत्तर तुला मिळून जाईल.' दुसऱ्या दिवशी सकाळी ओरडतच तो माणूस स्वामी विवेकानंदांकडे आला, 'स्वामीजी माझी कंबर, पोट दोन्हीही खूप दुखत आहे. एक प्रश्न काय विचारला मी, तुम्ही असे काय विचित्र उत्तर दिले त्याचे. माझी कंबर, पोट अगदी दुखून मी हैराण झालो आहे.' स्वामी मंद स्मित करत म्हणाले, 'बंधू, तुझ्या प्रश्नाचे उत्तर तुला मिळाले नाही काय? अरे जिने नऊ महिने तुला पोटात घेऊन तुला वाढवले, तुझे कधीही तिला ओझे झाले नाही, तिने कधीही कंटाळा केला नाही. त्या मातेची महती ही तिन्ही लोकांत सर्वश्रेष्ठच आहे.'

तात्पर्य : आईसारखे दैवत साऱ्या जगतामध्ये नाही.

- शिक्षकांनी वरील गोष्टीचे वाचन करून घ्यावे. (या गोष्टी व्यतिरिक्त विद्यार्थी स्तरानुसार इतर गोष्टींचीही निवड करावी.)
- गोष्टीतील प्रसंगावर आधारित विविध प्रश्न विचारून विद्यार्थ्यांच्या गप्पा घ्याव्यात .

सक्षम बनू या



- वरील चित्राचा वापर करून चित्राद्वारे गोष्ट तयार करून घ्यावी , तोंडी सराव घ्यावा.
- इंटरनेटच्या सहाय्याने गोष्टींचे व्हिडिओ दाखवावे आणि चर्चा घडवून आणावी.

चला सराव करू या

(विद्यार्थ्यांचे गट करावेत. वेळेच्या नियोजनानुसार खालील उपक्रम गटात अगर वैयक्तिक घ्यावे .)

- अपूर्ण गोष्ट पूर्ण करून घेणे.

खालील अपूर्ण कथा पूर्ण करा.

दिवस कधी मावळला ते कळलेच नाही त्या दिवशी! पाहुण्यांनी घर भरून गेलं होतं. आजीच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण होत होती. सर्वजण या निमित्ताने एकत्र आलेले पाहून आजी तृप्त झाली होती. एकमेकांशी रक्ताने व मनाने जोडलेल्या तीन पिढ्या एकत्र जमल्या होत्या. दिवसभराच्या कार्यक्रमानंतर संध्याकाळी हास्यविनोदात, मनमोकळ्या गप्पांत सारेजण दंग होते आणि अगदी अचानक या गप्पांत एक अनोळखी आवाज ऐकू आला. 'जिजी...मी आलो ग!' खूप वर्षांनी आजीने हा आवाज ऐकला आणि .....
.....

- प्रसंगाचे वर्णन करणे. उदा. सण, शाळेत साजरी होणारी जयंती कार्यक्रम, पुण्यतिथी, वाढदिवस, वाचन प्रेरणा दिन, हात धुवा दिन.
- गोष्टीची सुरुवात, गोष्टीचा मध्य व शेवट देऊन गोष्ट पूर्ण करून घेणे.
  (यासाठी मुलांच्या भावविश्वातील उदाहरण द्यावे.)

कल्पक होऊ या

- निर्जीव वस्तू जर सजीवांसारख्या वागू लागल्या तर त्यांच्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांवरून एखादी गोष्ट तयार करण्यास विद्यार्थ्यांना गटात अगर वैयक्तिक प्रोत्साहन द्यावे.
- तुम्हाला आवडणारी एखादी गोष्ट सांगा आणि त्यातील कोणते पात्र तुम्हाला होण्यास आवडेल ते सकारण सांगा.

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर.

आठवा दिवस

क्षेत्र – लेखन

कौशल्य:- व्यक्तीचित्र लेखन

अध्ययन निष्पत्ती- ६ वी - आपल्या परिसरातील व्यक्तीचे शब्दचित्र रेखाटतात.

जाणून घेऊ या

गवत्या चार कुडवाचा नोकर म्हणजे महिन्याला चार कुडव ज्वारी आणि वर्षाचे साल घेऊन काम करणारा. पण सकाळच्या चहापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत गवत्याचे सारे काही आमच्याकडेच होते. असे आहे म्हणून दोन कामे जास्ती करणे वगैरे गवत्याच्या स्वभावात नव्हते, उलट त्याला कामाचा प्रचंड आळस होता. कामे चुकवायची आणि मग त्याची मनाला वाटेल ती कारणे द्यायची

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना हा उतारा वाचायला सांगावा. हा उतारा वाचून गवत्या बद्दल तुमच्या मनात काय विचार आले ते लिहून काढण्यास सांगावे.)

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातील दररोज येणाऱ्या भाजीवाला, दुधवाला, फेरीवाला यांचे निरीक्षण करून खालील मुद्द्यांचा आधार घेऊन लिहायला सांगावे.

- व्यक्तिचित्रण
- स्वभाव
- लकबी
- जाहिरात करण्याची पद्धत

(याप्रमाणे उपलब्ध साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगून विविध मुद्द्यांवर लेखन करायला सांगावे. मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत चित्र असावे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलते करावे, विचार प्रवृत्त करावे. विविध मुद्द्यांवर आपले विचार लिहण्याचा सराव द्यावा.)

चला सराव करू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वत: चे मित्र, विविध प्रकारचे व्यावसायिक यांच्या विषयी विविध बाबींवर लेखनाचा सराव द्यावा.)

कल्पक होऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातील डॉक्टर काका कसे आहेत? .. असा प्रश्न करून त्यांच्या बद्दल आपले विचार लिहिण्यास सांगावे.)

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर.

नववा दिवस

क्षेत्र -भाषाभ्यास(व्याकरण)
कौशल्य– वाचन लेखन
संबोध- शब्दांच्या जाती-सर्वनामांचे प्रकार–भाग-१ (पुरुषवाचक सर्वनाम)

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात.
उदा. सर्वनामांचे प्रकार
७ वी-विविध विषय आणि उद्देशांसाठी लिहिताना इतर व्याकरणिक घटकांचा उपयोग करतात

जाणून घेऊ या

- **सर्वनामेओळख.**

आमचा देवरायांचा अभ्यास चालू असताना आम्हाला एक दिवस एक पोस्टकार्ड आले. ते होते श्रीवर्धन तालुक्यातल्या गाणी गावाच्या ग्रामस्थांचे. त्यांनी लिहिले होते की, 'आमच्या गावच्या दहा हेक्टरच्या देवराईतल्या झाडांवर तोड करायची म्हणून वन विभागाने छापे मारले आहेत. आम्ही ही देवराई तोडू नका म्हणून रेन्जरला विनंती केली. तो म्हणाला, वरून आदेश आला तरच मी तोड थांबवू शकतो. त्याने ऐकले आहे की, वर्तक-गाडगीळ देवारायांचा अभ्यास करताहेत. त्यांची आमच्या साहेबांशी ओळख आहे. त्यांना लिहून बघा, कदाचित ते मदत करू शकतील तुम्हाला. त्याच्या या सांगण्यावरून आम्ही हे पत्र लिहीत आहोत. तुम्ही आमच्या गावाला या. आमची राई बघा आणि आम्हाला काही ना काही करून मदत करा.'

(शिक्षकांनी वर्गात वरील वर्तमानपत्रातील कात्रणांचे/ समांतर मजकूराचे गटात वाटप करावे तसेच मजकूरातील सर्वनामांची यादी विद्यार्थ्यांच्या मदतीने फळ्यावर लिहावी. सर्वनामाची व्याख्या व उदाहरणे यातील संबंध यावर थोडक्यात चर्चा घ्यावी तसेच नामाच्या प्रमाणे सर्वनामे ही सुद्धा वेगवेगळ्या प्रकारची असतात हे फक्त लक्षात आणून द्यावे.)

सक्षम बनू या

- **समजून घेऊ सर्वनामांचे प्रकार**

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सर्वनामाचे चार प्रकारआहेत हे सांगावे. पुरुषवाचक सर्वनाम, त्याचे प्रकार यांच्या व्याख्या व उदाहरणे समजावून सांगावे. तसेच स्वत:च्या मार्गदर्शनाखाली वर सांगितलेल्या उपलब्ध कात्रणामधील सर्वनामांची पुरुषवाचक सर्वनाम याच्या ३ प्रकारांमध्ये वर्गीकरण करून घ्यावे.)

चला सराव करू या

(पुढील कृतींचा अधिकचा सराव विद्यार्थ्यांकडून वैयक्तिकरित्या करून घ्यावा.)

- **रिकाम्या जागी चौकोनात दिलेल्या सर्वनामांचा योग्य जागी वापर करून लिही.**

- उदा. १. दरवाजा उघड कदाचित .....आली असेल.

२.....गाणे गाता येत नाही ?

३ .चला, ... सर्वजण मिळून स्वच्छता करूया !

आम्हाला	आपण	
तिला	तुला	ती
तू		

- **पुरुषवाचक सर्वनामाचा प्रकार ओळखून ३-३ उदाहरणे लिहिण्यास सांगावीत.**

१. स्वतः विषयी बोलताना वापरले जाणारे सर्वनाम-

२. ज्याच्याशी बोलतो त्याच्यासाठी वापरले जाणारे सर्वनाम-

३. ज्याच्याविषयी बोलतो त्याच्यासाठी वापरले जाणारे सर्वनाम-

कल्पक होऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खाली दिलेल्या पुरुषवाचक सर्वनामांचा योग्य ठिकाणी वापर करून ८-१० वाक्यांचे संवाद लेखन करण्यास सांगावे.)

मी, स्वतः, तू, तुम्ही, तो,
त्या ती,आम्ही

पूरक साहित्य स्रोत

गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर, वर्तमानपत्र कात्रणे अथवा प्रोजेक्टरवर दाखवण्यासाठी सॉफ्ट कॉपी.

दहावा व अकरावा दिवस

क्षेत्र – वाचन
कौशल्ये- आरोह – अवरोहांसह व योग्य गतीने वाचन

अध्ययन निष्पत्ती – विविध शैलीतील साहित्य प्रकारचे आरोह – अवरोहांसह व योग्य गतीने वाचन करतात.

जाणून घेऊ या

कृती १ - योग्य गतीने, आरोह - अवरोह व विरामचिन्हे यांची दखल घेऊन वेळेत गोष्टीचे प्रकटवाचन करणे. कार्यपद्धती - एका गोष्टीचे प्रकट वाचन करावे. ही गोष्ट वाचताना, आवाजातील बदल म्हणजेच चढ-उतार ठेवणे, विरामचिन्ह यांच्या जागी थांबणे, चेहऱ्यावरील हावभाव बदलणे या क्रिया करून घ्याव्यात. पूर्णविराम, स्वल्पविराम, अर्धविराम, प्रश्नचिन्ह, अवतरण चिन्ह या विरामचिन्हांचा अर्थ लक्षात आणून द्यावा. तसेच पुस्तक कसे धरावे, डोळे आणि पुस्तक यातील अंतर किती असावे हे कृतीतून दाखवावे.

तसेच दृष्टीचा आवाका म्हणजे एका दृष्टिक्षेपात किती शब्द वाचले जावेत तसेच वाचताना आकलनासाठी एकाग्रता कशी महत्त्वाची आहे हे स्पष्ट करावे. वाचनाचा वेग ४० ते ८० शब्द प्रतिमिनिट हळूहळू कसा वाढवावा हे सांगावे. मजकुराचे आकलन झाले की वाचन वेग वाढतो. याच वेळी गोष्टीवर आधारित प्रश्न कसे तयार करावे आणि कसे विचारावे. याचेही प्रात्यक्षिक दाखवावे.

सक्षम बनू या

कृती – गटात सहावीच्या पाठ्यपुस्तकातील निवडक उताऱ्यांचे प्रकटवाचन करून प्रश्न निर्मिती करणे. कार्यपद्धती - किमान पाच विद्यार्थ्यांचा एक गट तयार करावा. पाठ्यपुस्तकातील वीस ओळी असलेले उतारे निश्चित करून विद्यार्थ्यांना त्याचे प्रकट वाचन करावयास लावावे. एका विद्यार्थ्याचे प्रकट वाचन चालू असताना बाकीचे विद्यार्थी ऐकतील आणि उतारा वाचनानंतर त्याने कसे वाचले? यावर चर्चा करण्यास सांगावे. ही चर्चा आरोह-अवरोह आणि विराम चिन्हाचा अर्थ लक्षात घेऊन वाचन यावर आधारित असावी. त्याच गटातील मुले प्रश्न तयार करण्यास सांगावे व त्यावर चर्चा घडून आणावी. मुलांना बहुपर्यायी प्रश्न तयार करण्यास सांगावे. गटातील सर्व विद्यार्थ्यांचे प्रकट वाचन होईपर्यंत ही कृती चालू ठेवावी.

चला सराव करू या

कृती - अपूर्ण गोष्टीचे प्रकटवाचन करून गोष्ट पूर्ण करणे.

कार्यपद्धती - गोष्टीच्या बँक मधील निवडक गोष्टी विद्यार्थ्यांसमोर ठेवाव्यात. त्यातील गोष्टीचे मध्यापर्यंत प्रकटवाचन करावयास लावावे. योग्य ठिकाणी त्याचे वाचन थांबवून त्याला गोष्ट पूर्ण करण्यास सांगावी. गोष्टीचे लेखन करून घ्यावे तसेच लिहिलेल्या गोष्टीचे आरोह- अवरोहासहित वाचन घ्यावे.

कल्पक होऊ या

कृती - पत्रे, रोजनिशी, अभंग, यांचे प्रकट वाचन करणे.

कार्यपद्धती – परिसरातील ज्येष्ठ व्यक्ती व आंतरजालाचा वापर करून काही रोजनिशी, पत्रे , अभंग याचे संकलन करून घ्यावे. यांचे प्रकट वाचन विद्यार्थ्याकडून जोडीत करून घ्यावे. प्रकट वाचनानंतर दोघांमध्ये चर्चा करण्यास सांगावी. वाचन करताना आरोह- अवरोह व गती बाबत आपल्या जोडीदाराचे निरीक्षण करण्यास सांगावे. या कृतीत विद्यार्थी एकमेकांचे मूल्यमापन करता करता स्वयंमूल्यमापनही करतील याकडे लक्ष द्यावे.

पूरक साहित्य स्रोत

आंतरजालावरील, पत्रे, रोजनिशी, अभंग, विद्यार्थ्यांनी स्वतः लिहिलेली रोजनिशी. अकबर बिरबल, सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त गोष्टींची पुस्तके, सहावीच्या पुस्तकातील निवडक उतारे.

बारावा दिवस

क्षेत्र – मौखिक भाषा विकास ,
कौशल्य- श्रवण , संभाषण

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- रेडिओ,दूरदर्शन ,वर्तमानपत्रे,इंटरनेट याद्वारे पाहिलेल्या,ऐकलेल्या घटना स्वतः च्या शब्दांत मांडतात.

७ वी- कोणतेही चित्र/घटना,प्रसंग पाहून त्याचे स्वतः च्या पद्धतीने तोंडी किंवा लेखी स्वरूपात वर्णन करतात.

जाणून घेऊ या

- रेडिओ,दूरदर्शन,वर्तमानपत्रे,इंटरनेट याविषयी मुलांना कोणती माहिती आहे हे विविध प्रश्नांच्या द्वारे जाणून घ्यावे .
- वर्तमानपत्रातील बातमीचे वाचन करून देऊन त्यावर आधारित घटनेविषयी चर्चा करून घ्यावी.

सक्षम बनू या

(खालील प्रश्नांद्वारे विद्यार्थ्यांना बोलते करावे.)

- दूरदर्शनवरील कोणता कार्यक्रम तुम्हाला आवडतो ? का?
- रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट या चारही साधनांमध्ये कोणता फरक आहे?

चला सराव करू या

(खाली दिलेल्या उपक्रमामध्ये मुलांना सुविधा उपलब्ध करण्याबाबतीत साहाय्य करावे.)

- इंटरनेट वरून गडकिल्ल्यांची माहिती घ्यावयाची असेल तर ती कशी घेणार ?
- रेडिओ वरील कोणताही एक कार्यक्रम ऐकून त्या कार्यक्रमातील भाव समजून घेऊन आपले मत द्या. उदा. चिंतन, पुस्तक वाचन, आपल्या जिल्ह्यातील आकाशवाणी केंद्र इत्यादी.

कल्पक होऊ या (आव्हाने

- समजा तुम्ही टी.व्ही.स्टार झालात तर .....

(विद्यार्थ्यांना कल्पना मांडण्यास प्रेरित करावे.)

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर.

तेरावा दिवस

क्षेत्र – लेखन

कौशल्य:- अनुभव लेखन

अध्ययन निष्पत्ती- ६ वी - वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या उद्दिष्टानुसार लिहिताना शब्द शब्दसमूह वाक्य व वाक्प्रचार व म्हणी यांचा योग्य वापर करतात.

जाणून घेऊ या



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. आपल्या परिसरातील दररोजच्या जीवनात आपणास कोणकोणत्या म्हणी, वाक्प्रचार ऐकायला अनुभवायला आले त्यांची यादी तयार करायला सांगावी तसेच चित्र मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत चित्र असावे.)

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांनी लिहिलेल्या यादीवर प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलते करावे. उदा.”नाचता येईना अंगण वाकडे” म्हणजे काय?

ही म्हण कशी तयार झाली असेल? असे प्रश्न विचारून विचार प्रवृत्त करावे. विविध शब्द, शब्द समुह, म्हणी, वाक्प्रचार या कशा तयार झाल्या असतील यावर चर्चा करून आपले विचार लिहिण्याचा सराव द्यावा.

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या मित्राला त्यांनी केलेल्या यादीतील कोणत्याही तीन म्हणी व वाक्प्रचाराचा अर्थ सांगायला लावावा व त्यावर आधारित एक गोष्ट तयार करायला सांगावी.

चला सराव करू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपल्या पाठ्यपुस्तकात दिलेल्या वाक्प्रचार, म्हणी अकारविल्हे म्हणजे वर्णमालेच्या क्रमानुसार लिहिण्यास सांगावे - कोणत्याही दहा)

कल्पक होऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कानामागून आली तिखट झाली ... हे वाक्य तुम्ही ऐकले तर असेच का म्हटले असेल? त्याबद्दल आपले विचार लिहून काढायला सांगावेत. संवाद लिहिले तर फारच छान!)

पूरक साहित्य स्रोत

गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, शब्दकोश, वर्तमानपत्र कात्रणे अथवा प्रोजेक्टरवर दाखवण्यासाठी सॉफ्ट कॉपी.

चौदावा
दिवस

क्षेत्र -भाषाभ्यास(व्याकरण)
कौशल्य- लेखन
संबोध - शब्दांच्या जाती-सर्वनामांचे प्रकार–भाग-२
(प्रश्नार्थक सर्वनाम)

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात. उदा.
सर्वनामांचे प्रकार
७ वी-विविध विषय आणि उद्देशांसाठी लिहिताना इतर व्याकरणिक घटकांचा उपयोग करतात

जाणून घेऊ या

- **सर्वनामे ओळखून गोल कर व त्याची वाक्ये तयार कर.**

राकेश त्या फुले राणी आपण
त्याला माकड आंबा तू भारत स्वतः

(शिक्षकांनी वरीलप्रमाणे शब्द फळ्यावर लिहावे. त्यातील सर्वनामांना गोल करून व त्याची वाक्ये तयार करूनघ्यावी.)

सक्षम बनू या

- **समजून घेऊ प्रश्नार्थक सर्वनाम .**

(मी, कोणते, तू, तुम्ही,तो,त्या,कोण,ती,आम्ही,कोणी,त्या ,काय,कोणाला,आपण,त्याला,तू, स्वतः,कोणती,ह्या)

प्रथम पुरुषवाचक सर्वनाम	द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम	तृतीय पुरुषवाचक सर्वनाम	प्रश्नार्थक सर्वनाम

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्नार्थक सर्वनाम, त्यांच्या व्याख्या व उदाहरणे समजावून सांगावे नंतर एकत्रित दिलेल्या सर्वनामांचे व अधिकच्या सर्वनामांचे पुरुषवाचक सर्वनाम व प्रश्नार्थक सर्वनाम या दोन प्रकारांत वर्गीकरण करून घ्यावे.)

चला सराव करू या

(शिक्षकांनी सरावासाठी पुढील प्रमाणे इतर मजकूराचा वापर करून सराव घ्यावा.)

- पुढील संवादात रिकाम्या जागी कंसातील सर्वनाम निवडून लिही.

रेश्मा: अरे व्वा! तू ..... आलीस ? तुझ्या सोबत .....आले आहे ? (कोणाच्या, ते, कधी, कोण)

सुनिता: अगं, बाबा इकडेच येत होते, मग .....त्यांच्यासोबत आले. (आपण, मी, कधी,त्यांच्या)

रेश्मा : .....खायला .....बनवू ? (तिच्या, मी,काय ,त्यांच्या)

सुनिता: नको,.....जेवूनच निघालो. (त्या,आम्ही,मी, आपण)

रेश्मा: मी.....केक बनवला आहे. ....केक घे. (स्वतः,आम्ही,हा, कधी)

कल्पक होऊ या



(शिक्षकांनी वर तक्त्यात दिलेली सर्वनामे वापरून दिलेल्या चित्रावर पाच वाक्ये लिहिण्यास सांगावी.)

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, वयोगटास व घटकास अनुसरून चित्रे, भाषा पेटीतील A4 चित्रे.

प्रश्न:१. ऊस आणि कैरी या पदार्थांमध्ये असलेला फरक सांग. यांच्या पासून तयार होणाऱ्या पदार्थांची नावे सांग.

(मुलांना फरकाचे कमीत कमी दोन-दोन मुद्दे व दोन-दोन पदार्थांची नावे विचारावीत) **(गुण-२)**

प्रश्न:२. खाली दिलेला मासिकातील उताऱ्याचे वाचन कर व प्रश्नांची उत्तरे लिही. **(गुण-५)**

नुकताच एक प्रसंग वाचण्यात आला. एका धावण्याच्या शर्यतीत केनियाचा धावपटू हाबेल मुताई शर्यतीच्या अंतिम रेषेपासून अगदी काही फूट अंतरावर होता. पण तो गोंधळला आणि त्याला असे वाटले की आपण शर्यत पूर्ण केली. तो धावायचं थांबला. त्याच्या अगदी पाठीमागे स्पॅनिश धावपटू इव्हान फर्नांडिस होता. हाबेलची चूक त्याच्या लक्षात आली. तो अजून तुझी शर्यत पूर्ण झाली नाही, अंतिम रेषा पार कर म्हणून ओरडून सांगू लागला. पण त्याची भाषा हाबेलला येत नसल्याने त्याला काहीच कळत नव्हते. शेवटी इव्हानने या केनियाच्या धावपटूला अक्षरशः अंतिम रेषेच्या पलीकडे ढकलून दिले आणि जिंकण्यास मदत केली. जर ठरवले असते तर इव्हान स्वतः पुढे जाऊन ही शर्यत जिंकू शकला असता पण त्याने तसे केले नाही.

(उतारा वाचनास – २ गुण द्यावेत. प्रत्येक प्रश्नाच्या अचूक उत्तरास १ गुण द्यावा.)

अ) परिच्छेदामध्ये आलेली दोन पुरुषवाचक सर्वनामे कोणती ?

आ) हाबेलची चूक लक्षात आणून देणारे इव्हानचे कोणते उदगार परिच्छेदात आले आहे ?

इ) वरील प्रसंगातून इव्हानचा कोणता गुण तुला दिसून येतो ?

प्रश्न:३. खालील वाक्यातील विशेषनाम व भाववाचक नाम बदलून वाक्य पुन्हा लिही. **(गुण-२)**

- सुरेशचा स्वभाव मनमिळावू आहे.

प्रश्न:४. खाली दिलेल्या कोणत्याही एका विषयावर पाच ओळी माहिती लिही. **(गुण-३)**

(एकाच पुस्तकावर / एकाच पदार्थावर किमान पाच ओळीत अर्थपूर्ण माहिती लेखन असावे.)

आवडते पुस्तक किंवा आवडता पदार्थ

प्रश्न:५. अ) धडा शिकणे- (वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करून लिही.) **(गुण-१)**

ब) दोन्ही बाजूंनी सारखीच अडचणीची स्थिती निर्माण होणे. (या अर्थाची म्हण लिही.) **(गुण-१)**

क) खालील वाक्य कोणत्याही दोन प्रकारे वाचून दाखव.(आनंद/दुख:/राग/प्रश्नार्थक/हास्य..) **(गुण-१)**

- मला आणि दादाला तुझ्या सोबत यायचे आहे.

सोळावा व सतरावा दिवस

क्षेत्र – वाचन
कौशल्ये- मजकुराचे वाचन करून शीर्षक देणे.

अध्ययन निष्पत्ती - एखादा मजकूर ढोबळमानाने वाचून, त्यातील एखाद्या मजकुराचे बारकाईने निरीक्षण करून, त्यातील मुद्द्यांचा शोध घेतात, अंदाज बांधतात व निष्कर्ष काढतात.

जाणून घेऊ या

कृती - उतारा किंवा कविता यांचा आशय आणि त्यांचे शीर्षक यांचा सहसंबंध जाणून घेणे. कार्यपद्धती - शिक्षकांनी काही निवडक उतारे व कविता विद्यार्थ्यांसमोर ठेवाव्यात. त्याचे मुकवाचन करावयास सांगावे. त्याचे शीर्षक आणि त्यातील आशय याचा सहसंबंध समजून घेण्यास लावावा.

सक्षम बनू या

कृती – बातम्या किंवा निवडक उतारे यांचे प्रकटवाचन/मुकवाचन करून शीर्षक देणे. कार्यपद्धती - शिक्षकाने परिसरात उपलब्ध असलेली विविध वर्तमानपत्रे तसेच विविध मासिकांमधील निवडक विज्ञान जगत व अंधश्रद्धा विषयक बातम्या व उतारे याची कात्रणे विद्यार्थ्यांना द्यावीत. यावेळी त्याला शीर्षक नसावे. विद्यार्थी त्याचे समजपूर्वक वाचन करून आपल्या समजूतीप्रमाणे शीर्षक देतील.

उदा. खालील मजकूर वाच आणि योग्य शीर्षक दे.

वैज्ञानिक दृष्टिकोन ही एक विचार करण्याची पद्धत आहे. निरीक्षण, परिक्षण, वर्गीकरण, पडताळा, तर्क आणि अनुमान यांचा वापर करून निष्कर्ष काढणे. स्वतः अनुभव घेतल्यानंतरच विश्वास ठेवणे. सर्व बाजूने विचार करणे. या बाबी वैज्ञानिक दृष्टिकोनात अभिप्रेत आहेत. हे जग स्वायत्त आहे. यात प्रत्येक गोष्ट एका विशिष्ट नियमाने घडत असतात आणि या प्रत्येक घडणाऱ्या घटनेमागे कार्यकारणभाव असतो. तो आपल्याला शोधून काढता येतो. तो पूर्णपणे सापडला नाही तरी ती दिशा योग्य असते आणि काही काळाने कार्यकारणभाव सापडतो. त्यामधील त्रुटी दूर करता येतात. वैज्ञानिक दृष्टीकोन असणारी व्यक्ती प्रत्येक गोष्टीकडे डोळसपणे पाहत असते. कितीही मोठ्या व्यक्तीचे मत असो, ते तपासून घेण्याची सवय वैज्ञानिक दृष्टिकोन असणाऱ्या व्यक्तीकडे असते. अशा वेळी मत व्यक्त करण्यास लागणारा निर्भयपणा त्या व्यक्तीकडे असतो. ती व्यक्ती नम्र असते. मला आता एवढेच समजले आहे, सध्या मिळालेल्या पुराव्यांनुसार हे मत मी मान्य करतो. यापेक्षा वेगळे उद्या काही समजले तर मी पूर्वीचे मत सोडेल, अशा प्रकारे त्याची वैचारिक धारणा स्पष्ट असते.

चला सराव करू या

कृती –बातम्या किंवा निवडक उतारे यांचे प्रकटवाचन/मुकवाचन करून शीर्षक देणे.
कार्यपद्धती - शिक्षकाने परिसरात उपलब्ध असलेली विविध वर्तमानपत्रे तसेच विविध मासिकेतील निवडक विज्ञान जगत व अंधश्रद्धा विषयक बातम्या व उतारे याची कात्रणे विद्यार्थ्यांना द्यावीत. यावेळी त्याला शीर्षक नसावे. विद्यार्थी त्याचे समजपूर्वक वाचन करून आपल्या समजुतीप्रमाणे शीर्षक देतील.
उदा. खालील मजकूर वाच आणि योग्य शीर्षक दे.

कल्पक होऊ या

कृती – जाहिराती वाचून नवीन शीर्षक देणे.
कार्यपद्धती – वेगवेगळ्या प्रकारच्या जाहिरातीचे प्रकार मुलांना समजून द्यावेत. उदा. व्यावसायिक जाहिराती (सर्कस, सिनेमा, नाटक, विविध वस्तू), प्रबोधनासाठी वा लोक जागृतीसाठीच्या जाहिराती (वैद्यकीय शिबिरे, रक्तदान शिबिरे, पाणी बचत, वृक्ष लागवड, विविध आजार विरुद्ध प्रतिबंध वा लसीकरण), शैक्षणिक जाहिराती (शाळा प्रवेश, शाळा सुविधा, शिक्षण जागृती), इत्यादी जाहिराती.

जाहिरात शिक्षकांनी वाचून त्याविषयी चर्चा करावी. जाहिरातीतील विविध पैलू जसे शीर्षक, आकर्षक घोषणा किंवा नारा, आकर्षक चित्र, मजकूर, इत्यादी समजून देतांना त्यामागील कार्यकारणभाव समजून द्यावा. मुलांना अनुभव मिळाल्यानंतर त्यांचे प्रकटवाचन घ्यावे. आकलन तपासण्यासाठी त्यांना त्याच जाहिरातीला नवीन शीर्षक द्यायला सांगावे. शीर्षक हेच का दिले यावर चर्चा करावी.

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती पुस्तकेतील निवडक कविता व गद्य उतारे, परिसरात उपलब्ध असलेली विविध वृत्तपत्रांतील कात्रणे व मासिकातील उतारे. विद्यार्थी हस्तलिखित उतारे. सहावीचे पाठ्यपुस्तक.

अठरावा दिवस

क्षेत्र –मौखिक भाषा विकास ,
कौशल्य- श्रवण , संभाषण

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट याद्वारे पाहिलेल्या, ऐकलेल्या घटना स्वतः च्या शब्दात मांडतात.

७ वी- कोणतेही चित्र/घटना, प्रसंग पाहून त्याचे स्वतः च्या पद्धतीने तोंडी किंवा लेखी स्वरूपात वर्णन करतात.

जाणून घेऊ या

(शिक्षकांनी वृत्तपत्रातील कोणतीही एक बातमी दाखवावी.)

- बातमीचे विद्यार्थ्यांकडून वाचन करून घ्यावे.
- बातमीतील वृत्तांतावर प्रश्नांद्वारे चर्चा घडवून आणावी.

सक्षम बनू या

- माहीत असलेली वृत्तपत्रांची नावे विद्यार्थ्यांच्याकडून विचारून घ्यावी .
- त्यातील तुमच्याजवळ असलेल्या वृत्तपत्रामधील शैक्षणिक बातम्या शोधून सांगण्याचे प्रात्यक्षिक घ्यावे .

चला सराव करू या

- तुमच्या शाळेत झालेल्या कोणत्याही कार्यक्रमाची (उदा.जयंती, पुण्यतिथी, विविध दिन इत्यादी) बातमी तयार करून त्याचे वर्गात सादरीकरण करून घ्यावे.
- वृत्तपत्रांमधील विज्ञानविषयक बातम्यांचा संग्रह करून गटा-गटामध्ये माहितीपर चर्चा करून घ्यावी.

कल्पक होऊ या

- तुम्ही मोठे झाल्यावर पत्रकार झालात तर कोणत्या क्षेत्रातील बातम्या अधिक आवडीने लिहाल यासारखे आव्हान विद्यार्थ्यांना देऊन त्यांना बोलते करावे .

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर, वर्तमानपत्रामधील कात्रणे, विविध कार्यक्रमाचे फोटो, मोबाईल, लॅपटॉप इंटरनेट सहित.

एकोणिसावा दिवस

क्षेत्र – लेखन

कौशल्य:- व्याकरणाचा लेखनात वापर

अध्ययन निष्पत्ती- ६ वी - व्याकरण घटकांची माहिती घेतात, व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात

उदा. नामाचे प्रकार, सर्वनामाचे प्रकार, विशेषण व विशेष्य, विशेषणाचे प्रकार, क्रियापदाचे प्रकार, शुद्धलेखनाचे नियम

जाणून घेऊ या

(शिक्षक विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील उताऱ्याचे वाचन करायला सांगावे. विद्यार्थ्यांना उताऱ्यातील नामांची यादी करून त्यासाठी आलेले सर्वनामे ओळखून लिहायला सांगावे .शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या मित्राला त्यांनी केलेल्या यादीतील कोणत्याही तीन नामाकरिता विशेषण लिहायला सांगावे. उतारा मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत असावा.)

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काय? कसे? कोण? कुठे ? असे प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलते करावे, विचार प्रवृत्त करावे. सुधा आंबा खाते . राजेश आंबा खातो . अशी विविध उदाहरणे देऊन वाक्य ,उताऱ्यातील विविध नाम बदलून त्यानुसार विशेषण, क्रियापद कसे बदलते यावर चर्चा करून आपली वाक्य पुन्हा लिहिण्याचा सराव द्यावा.

चला सराव करू या



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्र बघून आपल्याला आवडतील ती नाम, विशेषणे, क्रियापद घेऊन उतारा तयार करायला सांगावा.)

कल्पक होऊ या

माझे बाबा खूप मेहनत करतात. त्यांना आपल्या कामात अडथळा आणला तर राग येतो. त्यांना कोणतेही काम करायला अजिबात लाज वाटत नाही. त्यांना सगळे मामा म्हणतात. त्यांना आज सकाळी ताप आला.
(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना या उताऱ्यात वारंवार आलेले सर्वनाम व विशेषण बदलून हा उतारा पुन्हा लिहिण्यास सांगावा. त्यांच्या बद्दल आपले विचार लिहिण्यास सांगावे.)

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर, वर्तमानपत्रामधील कात्रणे, विविध कार्यक्रमाचे फोटो, मोबाईल, लॅपटॉप इंटरनेट सहित.

विसावा दिवस

क्षेत्र :-भाषाभ्यास(व्याकरण)
कौशल्य- वाचन, लेखन
संबोध-शब्दांच्या जाती- विशेषणांचे प्रकार

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात
उदा. विशेषणांचे प्रकार
७ वी-विविध विषय आणि उद्देशांसाठी लिहिताना इतर व्याकरणिक घटकांचा उपयोग करतात

जाणून घेऊ या

- **नामे व विशेषण यांच्या योग्य जोड्या जुळव.**

(शिक्षकांनी खालील प्रमाणे विद्यार्थ्यांना इतर नाम व विशेषण यांच्या योग्य जोड्या जुळवण्यास सांगाव्यात तसेच नाम व सर्वनामाप्रमाणे विशेषणाचेही विविध प्रकार असतात ही कल्पना द्यावी)

नाम	विशेषण
कारले	फाटका
कावळा	कडू
सदरा	हुशार

सक्षम बनू या

- **समजून घेऊ विशेषणाचे प्रकार.**
  (शिक्षकांनी विशेषणाचे गुणवाचक,संख्यावाचक व सार्वनामिक या तीन प्रकारांची व्याख्या व काही उदाहरणांसह चर्चा तसेच पान नं. ४१ वरील तक्त्याचे वाचन घ्यावे.)
- **पुढील परिच्छेदाचे वाचन करून त्यातील नाम व त्यांची विशेषणे खाली दिलेल्या तक्त्यात मांडूया.**

एका लहानशा खोलीमध्ये राजू दुपारी अभ्यास करत बसला होता. शेजारीच पाळण्यात लहान बाळ झोपले होते. ते छोटेसे बाळ अचानक रडू लागले. राजूने खूप वेळा झोका दिला. जितका झोका देई तितके बाळ दुप्पट रडू लागले. तितक्यात आई आत आली. आईला पहाताच बाळ हसले.राजूने लाल खूळखुळा दाखवून वाजवला. बाळाच्या दोन्ही गालावर खळ्या पडल्या. आई आणि राजू दोघांना आनंद झाला.

नाम	विशेषण	✓ (विशेषणाच्या प्रकाराखाली बरोबरचे चिन्ह करा.)		
		गुणवाचक	संख्यावाचक	सार्वनामिक

चला सराव करू या

- **रिकाम्या चौकटीत कोणते नाम/ विशेषण येईल?**

गाय		फुगा		नदी
	टोलेजंग		दहा	

- **पुढील प्रमाणे इतर अधिकची विशेषणे वापरून वाक्ये तयार करून सराव करून घ्यावा.** (आमची, केवढा, सहस्र, दहा, आंबट.....)

कल्पक होऊ या

(शिक्षकांनी पुढील प्रमाणे किशोर मासिकाचे मुखपृष्ठ / इतर दिलेल्या चित्राचे विशेषणांचा वापर करून आठ ते दहा ओळीत वर्णन सांगण्यास व नंतर लिहिण्यास सांगावे.)



पूरक साहित्य स्रोत

इ. ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील पेटीतील A4 चित्रे

एकविसावा दिवस

क्षेत्र –मौखिक भाषा विकास ,
कौशल्य- श्रवण , संभाषण

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- भिन्न वेळी आणि भिन्न विषयासंबंधी इतरांनी सांगितलेल्या गोष्टी समजून घेतात, स्वतः च्या भाषेत सांगतात.

७ वी- विविध लेखन प्रकारामध्ये लेखकाने मांडलेले विचार/आशय समजून घेतात,आशयाशी संबंधित स्वतःच्या अनुभवांवर आधारित साम्य, सहमती वा असहमती व्यक्त करतात.

जाणून घेऊ या

- शिक्षकाने प्रसंगानुरूप माहिती द्यावी. (उदा.हात धुवा दिन,वाचन प्रेरणा दिन) विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करावे.
- शिक्षक स्थानिक परिस्थिती संदर्भात एखादा मुद्दा (उदा. वृक्षारोपण,जत्रा- स्वयंसेवक, विविध स्पर्धा इत्यादी)उपस्थित करून त्याविषयी विद्यार्थ्यांचे मत घ्यावे.

सक्षम बनू या

- विद्यार्थी कुटुंबात होणाऱ्या चर्चेमध्ये आपले मत देतात की नाही याची शिक्षकांनी चाचपणी करावी.
- शाळेमध्ये असणाऱ्या सुविधांबाबत विद्यार्थ्यांचे मत घ्यावे, त्यांनी सुचविलेले बदलांचे कौतुक करावे .

चला सराव करू या

(शिक्षकाने खालील मुद्द्यांवर विद्यार्थ्यांना गटामध्ये चर्चा करण्यास प्रेरणा द्यावी.)

- गटामध्ये विद्यार्थी आपल्या मित्र/मैत्रिणीला कुटुंबाविषयी प्रश्न विचारून माहिती घेतात.
- आपल्या मित्र/मैत्रिणीला कुटुंबातील सदस्यांच्या कामांविषयी प्रश्न विचारून माहिती घेतात.

कल्पक होऊ या

- जर कोरोनाची तिसरी लाट आली तर तुम्ही कोरोना योद्धा म्हणून कोणती जबाबदारी पार पाडाल ?

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर,वर्तमानपत्रातील कात्रणे, विविध कार्यक्रमांचे फोटो.

बाविसावा दिवस

क्षेत्र :-भाषाभ्यास(व्याकरण)
कौशल्य- वाचन ,लेखन
संबोध - शब्दांच्या जाती- क्रियापद- कर्ता व कर्म -१

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात उदा. क्रियापदांचे प्रकार

७ वी-विविध विषय आणि उद्देशांसाठी लिहिताना इतर व्याकरणिक घटकांचा उपयोग करतात

जाणून घेऊ या

- **तुमच्या सहकारी मित्राला चित्रातील मुले काय करत आहे ते पूर्ण वाक्यात सांगा.)**



(शिक्षकांनी वर्गात वरील चित्रावर / उपलब्ध चित्रावर चर्चा घ्यावी. चर्चेतील कोणतीही ५ वाक्ये फळ्यावर लिहावी. सांगितलेल्या व लिहिलेल्या वाक्यांमधील क्रियापदे कोणती ते विचारावे.)

सक्षम बनू या

- **समजून घेऊ कर्ता व कर्म.**

(क्रियापदास 'कोण' प्रश्न विचारल्यास येणारे उत्तर म्हणजे कर्ता होय तर क्रियापदास 'काय' प्रश्न विचारल्यास येणारे उत्तर म्हणजे 'कर्म'होय. ही संकल्पना चित्रावरून मिळालेल्या वाक्यावरून शिक्षक स्पष्ट करून सांगतील.)

चला सराव करू या

- वाक्य अर्थपूर्ण तयार होण्यासाठी क्रियापद, कर्ता व क्रियापद यांच्या रिकाम्या जागा भरा. **(शिक्षकांनी सरावासाठी पुढील प्रमाणे अधिक उदाहरणे द्यावीत.)**

कर्ता	कर्म	क्रियापद	वाक्य
शकीला	पुस्तक	वाचते	शकीलाने पुस्तक वाचले .
गाय		दिले	
	गुलाबजाम		

कल्पक होऊ या (आव्हाने)



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आकृतीतील अथवा इतरकर्ता, क्रियापद यांची अधिकची उदाहरणे घेऊन त्यामध्ये आवश्यक कर्म वापरून प्रथम तोंडी नंतर लेखी स्वरूपात वाक्ये तयार करण्यास सांगावी.) उदा. रमेश व्यायाम करतो.

पूरक साहित्य स्त्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर, प्रसंग/ कृती चित्रे

तेविसावा दिवस

क्षेत्र – लेखन

कौशल्य:- स्व-अभिव्यक्ती लेखन

अध्ययन निष्पत्ती- ६ वी - मराठी भाषेतील विविध साहित्य, सामुग्री ,वृत्तपत्र पत्रिका, कथा ,माहिती देणारी साधने, इंटरनेटवर प्रसिद्ध साहित्य समजपूर्वक वाचतात आणि त्यावरून आपली आवडनिवड स्वभाषेत किंवा ब्रेल लिपीत व्यक्त करतात.

जाणून घेऊ या

ऑमलेट (मंगेश पाडगावकर)

कोंबडीच्या अंड्यामधुन
बाहेर आले पिल्लू ;
अगदी होते छोटे
आणि उंचीलाही टिल्लू !

कोंबडी म्हणाली, " पिल्लूबाय,
सांग तुला हवे काय ?
किडे हवे तर किडे,
दाणे हवे तर दाणे;
आणून देईन तुला
हवे असेल ते खाणे !"

पिल्लू म्हणाले, "आई,
दुसरे नको काही;
छोट्याशा कपामधे चहा भरुन दे,
मला एका अंड्याचे ऑमलेट करुन दे !"

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कविता वाचून दाखवावी. कविता पुन्हा वाचायला सांगावी. ही कविता वाचून त्यांच्या मनात काय विचार आले ते स्वत: च्या शब्दात लिहून काढायला सांगावे. उतारा, कविता मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत असावी.)

सक्षम बनू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कवितेवर आधारित प्रश्न विचारून विद्यार्थ्याना बोलते करावे, विचार प्रवृत्त करावे. स्वत:च्या कविता लिहिण्याचा सराव द्यावा.)

उदा. आपण सारे शाळेत जाऊ.

.....

(या ओळीने सुरवात करून कविता पूर्ण करायला सांगावी)

चला सराव करू या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्यावी.
- आपल्या आवडत्या पदार्थाबद्दल मित्रासोबत चर्चा करा.
- तो पदार्थ बनवण्यासाठी कोणते पदार्थ लागतात ? त्याची कृती काय ते लिहा.
- गरज पडल्यास आपल्या आईची, मित्राची मदत घ्यावी.

कल्पक होऊ या





(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्यावी. दिलेल्या चित्रांचे निरीक्षण करून विद्यार्थ्यांना आठवलेला एखादा प्रसंग, या बद्दलची काही विशेष माहिती, त्यांच्या शब्दात लिहून काढण्यास सांगावी.)

पूरक साहित्य स्त्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर, प्रसंग/ कृती चित्रे

चोविसावा व पंचविसावा दिवस

क्षेत्र – वाचन
कौशल्य – नवीन शब्दांचे अर्थ समजून वाचन करणे.

अध्ययन निष्पत्ती – १.नव्या शब्दाविषयी जिज्ञासा व्यक्त करतात. त्या शब्दाचे अर्थ जाणून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करतात.

अध्ययन निष्पत्ती - २.वाचन मराठी भाषेतील बारकावे, रचना, यांच्याकडे लक्ष देऊन त्यांचे कौतुक करतात.(उदा. कवितेतील गेयता, कथेतील वा निबंधातील वाक्प्रचार, म्हणी, सुविचार)

जाणून घेऊ या

कृती १- शब्द, म्हणी व वाक्प्रचार यांची यादी करून वाचन करणे.

कार्यपद्धती - प्रत्येक विद्यार्थ्याला इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकातील पाठाचे वाटप करून त्यातील नवीन शब्द, म्हणी व वाक्प्रचार याची यादी तयार करण्यास सांगावे. त्यांचे अर्थ लिहून प्रकट वाचन घ्यावे.

सक्षम बनू या

कृती- शब्दकोश बनवून, शब्दकोशातील शब्दांचे अर्थ शोधून लिहिणे व त्याचे वाचन घेणे.

कार्यपद्धती - विद्यार्थ्याने लेखन केलेले शब्द आकारविल्हे यानुसार त्याची मांडणी करून घ्यावी व नवीन शब्दांचा शब्दकोश तयार करावा. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शब्दकोशातील शब्दांचे अर्थ शोधण्यासाठी विद्यार्थ्यांना शब्दकोश व इतर साहित्य उपलब्ध करून द्यावे. विद्यार्थी स्वतः त्याचे अर्थ शोधून ते शब्दकोशामध्ये लिहितील व त्याचे वाचन करतील. यावेळी शिक्षकांनी सुलभन करावे.

चला सराव करू या

कृती - शब्दकोशातील शब्दांचे, म्हणींचे, व वाक्प्रचाराचे अर्थासह गटात प्रकटवाचन घेणे.

कार्यपद्धती - शब्दकोशातील कठीण शब्दांचे प्रकटवाचन करून दाखवावे. वाक्प्रचार व म्हणी यांचे योग्य वाचन कसे करते करतात हे उदाहरणासह मांडावे. यानंतर वर्गातील उत्तम वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शब्द, म्हणी व वाक्प्रचार आणि त्यांचे अर्थ यांचे प्रकट वाचन करण्याची संधी द्यावी. त्यानंतर हळूहळू उर्वरित सर्वच विद्यार्थ्यांचे प्रकट वाचन घ्यावे. वाक्प्रचारांचे वाचन घेत असताना विद्यार्थ्यांना त्याचा वाक्यात उपयोग करायला सांगून अर्थाचे आकलान तपासावे.

कल्पक होऊ या (आव्हाने)

कृती - शब्द, म्हणी, वाक्प्रचार यांच्या आधारे गोष्ट लिहून, वाचून दाखविणे.

कार्यपद्धती - ही कृती गटात घ्यावी. गटातील इतर सदस्याने विद्यार्थ्यांना निवडक शब्द, म्हणी द्यावेत. विद्यार्थी त्या आधारे गोष्ट लिहून घ्यावी. गटात तिचे वाचन करून घ्यावे.

उदा. खालील म्हणींवर आधारित गोष्ट लिहा व तिचे प्रकटवाचन करा.

१.अति तेथे माती.

२.पळसाला पाने तीनच.

३.काखेत कळसा गावाला वळसा.

पूरक साहित्य स्रोत

विद्यार्थी निर्मित शब्दकोश, इयत्ता सहावीचे पाठ्यपुस्तक, म्हणी व वाक्प्रचार यादी, मराठी शालेय शब्दकोश.


सव्विसावा दिवस

क्षेत्र –मौखिक भाषा विकास ,
कौशल्य- श्रवण , संभाषण

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- भिन्न वेळी आणि भिन्न विषयासंबंधी इतरांनी सांगितलेल्या गोष्टी समजून घेतात, स्वतःच्या भाषेत सांगतात.

७ वी- घर व परिसरातील अनौपचारिक विषयांवरील संवाद ऐकतात,त्यात सहभागी होऊन आपले मत मांडतात

जाणून घेऊ या



- विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पोस्टकार्ड किंवा पोस्टकार्ड चे चित्र दाखवून संदेशवहनाच्या साधनांची माहिती द्यावी.
- सध्या वापरात असलेल्या साधनांबाबत चर्चा घडवून आणावी .

सक्षम बनू या

- ऑनलाईन शॉपिंग म्हणजे काय हे विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे प्रश्न विचारून प्रसंगी माहिती देऊन समजावून सांगावी.
- ऑनलाईन शॉपिंग मध्ये वस्तू घरी येईपर्यंतचा प्रवास समजावून सांगावा.

चला सराव करू या

- कुरिअर,स्पीड पोस्ट,पार्सल,ई मेल यांची माहिती यु-ट्यूब वरील व्हिडिओद्वारे समजून द्यावी आणि चर्चा घ्यावी.

कल्पक होऊ या

(खालील मुद्द्यांच्या आधारे शिक्षकाने चर्चा घ्यावी .)

- तुम्हाला कोणाला पत्र लिहायला आवडेल ? का ?
- समजा तुम्हाला आपल्या मुख्यमंत्र्यांसोबत फोनवर बोलण्याची संधी दिली तर तुम्ही काय बोलाल?

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर, मोबाईल, लॅपटॉप इंटरनेटसहित, विविध प्रकारची चित्रे.

सत्ताविसावा दिवस

क्षेत्र –मौखिक भाषा विकास ,
कौशल्य- श्रवण , संभाषण

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- भिन्न वेळी आणि भिन्न विषयासंबंधी इतरांनी सांगितलेल्या गोष्टी समजून घेतात,स्वतः च्या भाषेत सांगतात.

७ वी- घर व परिसरातील अनौपचारिक विषयांवरील संवाद ऐकतात,त्यात सहभागी होऊन आपले मत मांडतात.

जाणून घेऊ या



- विद्यार्थ्यांना वरील चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. . त्यावर आधारित चर्चा घडवून आणावी.
- सायकलचे कोणकोणते प्रकार तुम्हाला माहीत आहेत ते विद्यार्थ्यांना विचारावेत .
- कोणतीच वाहने अस्तित्त्वात नव्हती तेंव्हा लोक कशाचा वापर करत असतील याविषयी शिक्षकाने विद्यार्थ्यांकडून जाणून घ्यावे

सक्षम बनू या

(खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा घ्यावी.)

- सायकल सारखीच आणखी कोणती वाहने तुम्हाला माहीत आहेत?
- विद्यार्थी या वाहनांमध्ये असणारा फरक सांगण्याचा प्रयत्न करतील .
- पेट्रोलच्या वाहनांबरोबरच इलेक्ट्रॉनिक वाहनांबद्दल तुम्हाला कोणती माहिती आहे?

- खालील चित्राचे निरीक्षण करायला सांगून त्यातील प्रश्नावर आधारित उत्तरे घ्यावीत.



चला सराव करू या

(शिक्षकाने खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा घ्यावी .)

- सायकल शिकताना तुम्हाला कोणकोणते अनुभव आले किंवा कोणकोणत्या गमती जमती झाल्या?
- वाहन चालविण्याच्या नियमांबद्दल विद्यार्थ्यांशी चर्चा करतात.

कल्पक होऊ या

(खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा घ्यावी.)

- कल्पना करा - सायकलआणि मोटार सायकल बोलत आहेत तर ते काय बोलतील?
- तुमच्या गावात सायकल दुरुस्त करणाऱ्या व्यक्तीला तुम्ही कोणते प्रश्न विचारालं ?
- मोठे झाल्यावर तुम्हाला कोणते वाहन चालवायला आवडेल ?

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापीलमजकूर, मोबाईल,लॅपटॉप इंटरनेटसहित,विविध प्रकारची चित्रे

अठ्ठाविसावा दिवस

क्षेत्र-भाषाभ्यास(व्याकरण)
कौशल्य- वाचन, लेखन
संबोध - शब्दांच्या जाती-क्रियापदांचे प्रकार-२

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात उदा. क्रियापदांचे प्रकार

७ वी-विविध विषय आणि उद्देशांसाठी लिहिताना इतर व्याकरणिक घटकांचा उपयोग करतात.

जाणून घेऊ या

- **पुढील वाक्यातील कर्म असणारी व नसणारी वाक्ये वेगळी मांडा.**

उदा.१.घंटा वाजली.
२.सुलू सायकल चालवते.
३.आपण सर्वजन जाऊया.
४.बंड्या आणि जॉन खेळताना पडले.
५.सुमी छान वाचते.
६.बाईंनी खडू आणला.

(शिक्षकांनी फळ्यावर वाक्ये लिहून त्यातील कर्ता, कर्म, क्रियापद विचारावे तसेच कर्म असणारी व नसणारी वाक्ये वेग-वेगळी मांडण्यास सांगावीत.)

सक्षम बनू या

- **क्रियापदाचे प्रकार .**

(शिक्षकांनी क्रियापदांचे चार प्रकार कोणते ते सांगतील. सकर्मक, अकर्मक क्रियापद म्हणजे काय ते वरील वाक्यांवरून समजावून सांगावे.भाषा पेटीतील कृतीची चित्रे दाखवून त्यावरून वाक्ये तयार करून घ्यावी व त्यावर चर्चा घ्यावी.)

चला सराव करू या

पुढील क्रियापदांसाठी सकर्मक व अकर्मक असी दोन्ही प्रकारची वाक्ये तयार करा.
(पळाला, बोलते, करा, आवडते, भेटला)

कल्पक होऊ या (आव्हाने)



(पहा, सांगा आणि लिहा.) विषय- आमचा खेळ

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्रातील पात्रांना नावे देण्यास सांगून त्यावर आधारित सकर्मक व अकर्मक वाक्ये असणारा छोटा प्रसंग लिहून घ्यावा.)

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर, प्रसंग/ कृती चित्रे

एकोणतीसावा दिवस

क्षेत्र – लेखन

कौशल्य:- स्व-अभिव्यक्ती लेखन

अध्ययन निष्पत्ती- ६ वी - केलेल्या उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचे परिच्छेद करतात तसेच त्यास योग्य शीर्षक देतात.

जाणून घेऊ या

अमुक भागात इतका मिलीमीटर पाऊस पडला, तमुक भागात तितका सेंटीमीटर पाऊस पडला! ही नेमकी भानगड काय आहे? पण पाऊस किती पडला हे मोजणं शक्य आहे का? शक्य असेल तर कसं मोजतात आणि मुळात पाऊस मोजावा तरी का? पावसाबद्दल असले अनेक प्रश्न आपल्या डोक्यात असतात.. म्हणून चला तर शोधूया या सर्व प्रश्नांची उत्तर.पावसाची मोजणी होते तरी कशी? पावसाचं प्रमाण मोजण्यासाठी पर्जन्यमापक यंत्राचा वापर केला जातो. लिटर, चौरस मीटर (litters per square meter) किंवा मिलीमीटर हे एकक वापरून पाऊस मोजला जातो. यात मेट्रिक पद्धतीत 'मिलीमीटर' तर ब्रिटीश पद्धतीत 'इंच' हे देखील एकेक वापरले जाते. पाऊस मोजण्यासाठी लागणारी यंत्र काहीशी वेगवेगळी असू शकतात. पर्जन्यमापक यंत्राचे प्रकार पुढील प्रमाणे पर्जन्यमापक यंत्राचे दोन प्रकार असतात.

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उतारा दोनदा वाचन करायला सांगवे. दिलेल्या माहितीनुसार त्याचे योग्य परिच्छेद करायला सांगावे. याप्रमाणे उपलब्ध इतर उताऱ्यांचा वापर करून विद्यार्थ्यांना निरीक्षण करायला सांगून विविध मुद्द्यांनुसार परिच्छेद लेखन करायला सांगावे. मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत चित्र असावे.)

सक्षम बनू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उताऱ्यावर आधारित प्रश्न विचारून विद्यार्थ्याना बोलते करावे, विचार प्रवृत्त करावे. विविध मुद्द्यांवर आपले विचार लिहण्याचा सराव द्यावा. विविध प्रकारच्या शीर्षकांबद्दल विचार करून योग्य शीर्षक देण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.)

चला सराव करू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्यावी.)

विविध प्रकारच्या वाचन साहित्यातून कोणताही एक उतारा निवडून त्याचे आपणास योग्य वाटतील तसे परिच्छेद तयार करा. शीर्षक लेखनाचा सराव करा.

कल्पक होऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्यावी.)

कल्पना करा... आपण हवामान खात्याच्या अधिकाऱ्यांना भेटणार आहोत व आपल्याला त्यांची मुलाखत घ्यायची आहे. काय काय प्रश्न विचारायचे आहेत तशी प्रश्नावली तयार करा.

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर, प्रसंग/ कृती चित्रे

प्रश्न:१. अ) खाली दिलेला कर्ता वापरून सकर्मक व अकर्मक वाक्य लिही. **(गुण-२)**

प्रथमेश

ब) खालील विशेषण व त्या विशेषणाचा उपप्रकार लिहा. **(गुण-३)**

क्र.	शब्दसमूह	विशेषण	विशेषणाचा उपप्रकार
१.	नवा सदरा		
२.	दसपट झाडे		
३.	आम्ही बहिणी		

प्रश्न:२. इंटरनेट वरून घेतलेल्या या कवितेचे वाचन करून खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. **(गुण-५)**

नको नको ज्योतिषा, माझ्या दारी नको येऊ।
धनरेषांच्या च-यांनी, तळहात रे फाटला।
देवा तुझ्याबी घरचा, झरा धनाचा आटला।
माझे दैव मला कळे, माझा हात नको पाहू।
म्हणे नशिबाचे नऊ ग्रह, तळहाताच्या रेघोट्या।.
बापा नको मारू थापा, अशा उगा ख-या खोट्या |

-(बहिणाबाई चौधरी)

(कवितेच्या प्रकट वाचनासाठी २ गुण व प्रत्येक योग्य उत्तरासाठी १-१ गुण द्यावा.)

अ) कवयित्रीचा कोणत्या गोष्टीवर विश्वास असेल असे तुला वाटते?

आ) देवाच्याकडे सुद्धा आता संपत्ती नाही हे कवितेतील कोणत्या ओळींत सांगितले आहे?

इ) कवितेला योग्य शीर्षक दे.

प्रश्न: ३. शिक्षकांनी ऐकवलेली गोष्ट तुझ्या शब्दात दहा ओळीत लिही. **(गुण-३)**

(शिक्षकांनी एक छोटी गोष्ट मुलांना सांगावी. तीच गोष्ट मुलांना त्यांच्या शब्दांत/ भाषेत लिहिण्यास सांगावी.)

प्रश्न: ४.



सोबत दिलेल्या चित्राविषयी तुला कोणती माहिती आहे ते दोन ओळींत लिही. **(गुण-२)**

एकतिसावा दिवस

क्षेत्र-भाषाभ्यास(व्याकरण)
कौशल्य- वाचन, लेखन
संबोध- शब्दांच्या जाती-क्रियापदांचे प्रकार-३

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात उदा. क्रियापदांचे प्रकार

७ वी-विविध विषय आणि उद्देशांसाठी लिहिताना इतर व्याकरणिक घटकांचा उपयोग करतात

जाणून घेऊ या

- **"अ" गट व "ब" गट यातील वाक्यांच्या क्रियापदांमधील फरक सांगा.**

अ	ब
*बाबांनी पत्र लिहिले.	*बाबा पत्र लिहीत आहेत.
*सर्व मुलांनी अभ्यास केला.	*सर्व मुलांनी अभ्यास करून आणला.
*गणेशने लाडू खाल्ला.	*गणेशने लाडू खाऊन टाकला.

(शिक्षकांनी फळ्यावर वाक्ये लिहून त्यातील क्रियापद विचारावेत तसेच दोन गटातील वाक्यांच्या क्रियापदांमधील फरक यावर चर्चा करून घ्यावी.)

सक्षम बनू या

- **क्रियापदाचे प्रकार .**



(शिक्षकांनी क्रियापदांचे चार प्रकार कोणते ते सांगावेत. संयुक्त व सहायक क्रियापद म्हणजे काय ते वरील वाक्यांवरून समजावून सांगावे. मूळधातू व धातुसाधिते तक्ता दाखवावा. प्रदुषणाचे चित्र दाखवून त्यावरून वाक्ये तयार करून घेतील.) कंसातील सहायक क्रियापद व संयुक्त क्रियापद यांचा वापर करून लिहा वाक्ये**, उदा. (टाकून देतात, सोडतात, फेकले जाते , पाहिले, बघतच राहिले.**

चला सराव करू या

(शिक्षकांनी पुढील प्रमाणे व इतर वाक्यातील सहायक व संयुक्त क्रियापद विद्यार्थ्यांना वेगळे लिहिण्यास सांगावे.)

उदा. १.वाढदिवसाला शाळेत पुस्तके दिली जाई.

२.कोरोना विरुद्ध ठोस कार्यक्रम तयार केला गेला.

(दिलेल्या उदाहरणा प्रमाणे खालील धातूंपासून अथवा अधिकची उदाहरणे घेऊन धातुसाधिते लेखन सराव करून घ्यावे)

- उदा. **राब**– राबत, राबणे, राबवणे, राबणारा, राबून, राबला,

(**धातू-** आण, कर , वापर,जा .....)

कल्पक होऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कोणत्याही एका विषयावर १० वाक्ये लेखन करण्यास सांगावे. त्यामधील धातुसाधिते, धातू, संयुक्त क्रियापद व सहायक क्रियापद वेगळे करण्यासाठी सांगावे.)

उदा. तो पुन्हा बोलायला लागला.

धातुसाधिते- बोलायला, **धातू**- बोल, **संयुक्त क्रियापद**– बोलायला लागला, **सहायक क्रियापद**- बोलायला.

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, बालसाहित्य , वयोगटानुसार लिखित/छापील मजकूर / प्रसंग.

बत्तिसावा दिवस

क्षेत्र –मौखिक भाषा विकास ,
कौशल्य- श्रवण , संभाषण

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- १)आपल्या परिसरातील विभिन्न लोककथा आणि लोकगीते, बोलीभाषा जाणून घेऊन त्यांबद्दल चर्चा करतात, माहिती मिळवतात, आस्वाद घेतात

२)विविध कला (उदा. हस्तकला,वास्तुकला,कृषिकला,नृत्यकला,चित्रकला) यांसंबंधी जिज्ञासा व्यक्त करतात आणि त्याचा आनंद घेतात.

७ वी- १)परिसरातील लोककथा, लोकगीते,बोलीभाषा यांविषयी चर्चाकरतात,व आस्वाद घेतात.

२)विविध कला (उदा. हस्तकला,वास्तुकला,कृषिकला,नृत्यकला,चित्रकला)यांसंबंधी जिज्ञासा व्यक्त करतात,त्या समजून घेण्याचा प्रयत्न करतात आणि त्याचा आस्वाद घेतात.

जाणून घेऊ या

(वारली हस्तकलेचे चित्र दाखवून प्रश्न-उत्तराद्वारे चर्चा घ्यावी.)

- तुम्हाला माहीत असलेल्या नृत्यांच्या ५ प्रकारांची माहिती सांगा .



सक्षम बनू या

- आपल्या स्थानिक कला कोणत्या आहेत ? इतर कला आणि आपली स्थानिक कला यातील फरक विद्यार्थ्यांच्याकडून शिक्षकाने जाणून घ्यावे .
  उदा.कोळीनृत्य आणि लावणी नृत्य
- बोलीभाषा आणि प्रमाणभाषा यामधील फरक विद्यार्थ्यांना सांगण्यास प्रवृत्त करावे.
  (उदा.बोलीभाषेतील उतारा प्रमाणभाषेत रूपांतरीत करणे.)

चला सराव करू या

- बोलीभाषा आणि प्रमाण भाषा याव्यतिरिक्त इतर भाषा, लोककला यु ट्यूब वरील व्हिडीओच्या माध्यमातून आस्वाद घेतात आणि त्या विषयी इतरांना माहिती देतात.
  (शिक्षकांनी या संदर्भात इंटरनेटवरून व्हिडिओ उपलब्ध करून द्यावी आणि व्हिडिओ पाहत असताना चर्चा घ्यावी .)
- बोलीभाषेतील शब्दासाठी प्रमाण भाषेतील शब्द शोधण्यासाठी शब्दकोशाचा वापर करणे व शब्दाचा वाक्यात उपयोग करणे यासाठी शिक्षकाने मार्गदर्शन करावे.

कल्पक होऊ या

- पारंपरिक गीत आपल्या आजीकडून / परिवारातील अन्य व्यक्तीकडून शिकून त्याचे वर्गामध्ये सादरीकरण करा.

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, मोबाईल,लॅपटॉप इंटरनेटसहित, शब्दकोश

तेहतिसावा दिवस

क्षेत्र – लेखन

कौशल्य:- स्व-अभिव्यक्ती लेखन

अध्ययन निष्पत्ती - वेगवेगळ्या प्रसंगात /संदर्भात सांगितले जाणारे इतरांचे विचार गप्पा, स्वतःच्या शैलीत लिहतात. उदा. आपल्या गावातील चावडीवरील गप्पा किंवा आपल्या परिसरातील वेगवेगळे कार्य करणाऱ्या लोकांविषयीच्या गप्पागोष्टी.

जाणून घेऊ या



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. त्यांना त्यांच्या शेतातील अनुभव , मित्राच्या किंवा नातेवाईकांच्या शेतातील पीक व त्याचे संरक्षण या विषयी काय अनुभवायला आले ते लिहायला सांगावे. याप्रमाणे उपलब्ध इतर चित्रांचा वापर करून विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगून लेखन करायला सांगावे. मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत चित्र असावे.)

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलते करावे, विचार प्रवृत्त करावे.

- परिसरात ऐकू येणाऱ्या, दिसणाऱ्या जाहिराती
- लागवडपूर्व व नंतरची शेतकऱ्यांची लगबग

- रासायनिक खते व सेंद्रीय खते

यासह शेतीच्या विविध कामांसाठी लागणारे साहित्य, शेतीची मशागत, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात शेतीचे महत्त्व या विविध मुद्द्यांवर आपले विचार लिहिण्याचा सराव द्यावा.

चला सराव करू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कृषि उत्पन्न बाजार समिती बद्दल माहिती आहे का? असल्यास आढळून आलेल्या विविध बाबींवर लेखनाचा सराव द्यावा. नसेल तर समितीच्या आवारात असणाऱ्या विविध प्रकारच्या सुविधा बद्दल विविध माध्यमातून माहिती घेऊन लिहिण्यास सांगावे.)

कल्पक होऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्यावी.)

मी उद्योगपती झालो/झाले तर... विचार करा.. तुम्ही काय करणार? कोणत्या भागात उद्योग सुरू करणार? कोणकोणत्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणार विचार करा आणि लिहा.

पूरक साहित्य स्रोत

अनुभव विश्वातील चित्रे, इयत्ता ६ वी चे पाठ्यपुस्तक, युटयूब वरील व्यवसाया संबंधी व्हिडिओ.

चौतिसावा
दिवस

क्षेत्र – लेखन

कौशल्य:- स्व अभिव्यक्ती लेखन

अध्ययन निष्पत्ती - स्वतः चे अनुभव स्वतः च्या भाषाशैलीत लिहितात.

जाणून घेऊ या



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. अवघ्या जगाचा पोशिंदा शेतकऱ्यांबदद्ल आपणास काय वाटते ते लिहायला सांगावे. याप्रमाणे उपलब्ध इतर चित्रांचा वापर करून विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगून विविध मुद्द्यांवर लेखन करायला सांगावे. मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत चित्र असावे.)

सक्षम बनू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आधुनिक व पारंपरिक शेती, तंत्रज्ञान आणि नवीन संशोधन या विविध मुद्द्यांवर आपले विचार मांडण्याचा, लिहिण्याचा सराव द्यावा.)

चला सराव करू या



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शेतीपूरक व्यवसायाबद्दल माहिती आहे का? असल्यास विविध प्रकारच्या शेतीपूरक व्यवसायाबद्दल विविध बाबींवर लेखनाचा सराव द्यावा. नसेल तर विविध प्रकारच्या शेतीपूरक व्यवसायाबद्दल बद्दल माहिती देऊन/मिळवून त्याबद्दल लेखन सराव द्यावा.)

कल्पक होऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्यावी.)

तुमची पहिली शैक्षणिक सहल अनुभवली असेल तर ती आणि नसेल तर तुम्हाला कोठे जायला आवडेल, कोण कोणत्या बाबी बघणार , काय काय मज्जा करणार विचार कर आणि लिहा.

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, इंटरनेटसहित मोबाईल, लॅपटॉप

पस्तिसावा व छत्तिसावा दिवस

क्षेत्रे-भाषाभ्यास(व्याकरण)
कौशल्य- भाषण, लेखन
संबोध- काळ व त्याचे प्रकार- १
वेळ- २ तासिका

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात उदा. काळांचे प्रकार

७ वी- विविध विषय आणि उद्देशांसाठी लिहिताना इतर व्याकरणिक घटकांचा उपयोग करतात

जाणून घेऊ या

- **काळांचे प्रकार किती व कोणते ?**

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक काळाचे वाक्य उदाहरण म्हणून विचारावे तसेच खालील क्रियापदांचे काळ विचारावेत.)

[खातो, नाचला, खाल्ला, झोपेल, खाईल ,दिला, विकल्या,ठेवल्या]

सक्षम बनू या

- **काळांचे प्रकार व उपप्रकार**

(शिक्षकांनी काळांचे प्रकार व उपप्रकार कोणते ते सांगावे. काळांचे उपप्रकार व क्रियापद यांचा संबंध सांगावा. काळाच्या प्रकारांचे उदाहरण फळ्यावर लिहावी. वाक्यातील काळ व क्रिया नुसार वाक्यांची मांडणी खालील तक्त्यात विद्यार्थ्यांच्या मदतीने करावी)

काळ	सामान्य काळ	अपूर्ण क्रिया (अपूर्ण काळ)	क्रिया नुकतीच पूर्ण (पूर्णकाळ)	क्रिया सतत / नेहेमी घडते (रितिकाळ)
वर्तमानकाळ				
भूतकाळ				
भविष्यकाळ				

चला सराव करू या

- **काळ ओळखणे व क्रियापदाचा कंसात दिल्याप्रमाणे काळ बदलणे या कृती करून घ्याव्यात.**

उदा. १. राधा चित्र .....(काढ). (पूर्ण भूतकाळ)

२. राकेश रोज व्यायाम .....(कर).(अपूर्ण वर्तमानकाळ)

(शिक्षक वरील प्रमाणे वाक्ये देतील व काळ बदलून लिहिण्यास सांगतील.सर्वप्रकारच्या काळांच्या उदाहरणांचा सराव करून घेतील.)

कल्पक होऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रथम त्यांच्या आवडीच्या मजकुरातील ५ वाक्ये निवडून सहकारी मित्रास देण्यास सांगावी. त्या वाक्यांचा काळ ओळखून व तो बदलून वाक्ये पुन्हा लिहिण्यास सांगावी.नंतर त्यातील काही वाक्य घेऊन गटात छोटा प्रसंग/ गोष्ट तयार करण्यास सांगावी.)

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, बालसाहित्य, वयोगटानुसार लिखित/छापील मजकूरप्रसंग.

सदतिसावा दिवस

क्षेत्र –मौखिक भाषा विकास ,
कौशल्य- श्रवण , संभाषण

अध्ययन निष्पत्ती- ६ वी- कविता, गाणी अभिनयासह व योग्य आरोह – अवरोहासह आनंददायी पद्धतीने म्हणतात.
७ वी- पाठ्यविषय (गाणी, कविता, समूहगीते) योग्य अभिनयासह व योग्य आरोह – अवरोहासह म्हणतात. त्यांचे साभिनय सादरीकरण करतात.

जाणून घेऊ या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एक नवीन गाणे अभिनयासह म्हणायला सांगावे.
- गाण्यातून उमजलेल्या अर्थावरून शिक्षकाने चित्र काढून घ्यावी आणि त्याचे सादरीकरण घ्यावे.

सक्षम बनू या

- कवितेच्या अर्थाबाबतीत विद्यार्थ्यांची मते जाणून घ्यावीत .
- पाठ्यपुस्तकातील फुलपाखरू कवितेबद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधावा व कवितेचे अभिनायासहित सादरीकरण घ्यावे.

चला सराव करू या

- कवितांना / गाण्यांना चाली लावण्याच्या स्पर्धा घ्याव्या.
- कविता गायनाच्या स्पर्धा घ्याव्या.

कल्पक होऊ या

- आवडणारा पक्षी, प्राणी किंवा इतर कोणताही आवडणारा विषय घेऊन गाणे तयार करून त्याचे सादरीकरण करण्याचा प्रयत्न करा.
- कल्पना करा की तुम्ही फुलपाखरू आहात, तर तुम्ही कुठे जाल? काय बोलाल? कुणाशी बोलाल?
- संबंधित वेशभूषा करून एखादी वेगळी कविता/ गाणे गायन करण्याचा प्रयत्न करा.

पूरक साहित्य स्रोत

इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, गोष्टींची पुस्तके / बालसाहित्य , वयोगटाला अनुसरून योग्य लिखित/ छापील मजकूर, मोबाईल,लॅपटॉप इंटरनेटसहित

अडतिसावा व एकोणचाळिसावा दिवस

क्षेत्र – वाचन
कौशल्य – सूचना, कविता, निबंध याचे प्रकटवाचन व मुकवाचन

अध्ययन निष्पत्ती - वाचन मराठी भाषेतील बारकावे, रचना, यांच्याकडे लक्ष देऊन त्यांचे कौतुक करतात. (उदा. कवितेतील गेयता, कथेतील वा निबंधातील वाक्प्रचार, म्हणी, सुविचार)

जाणून घेऊ या

कृती - सार्वजनिक सूचना व त्याचे स्वरूप जाणून घेणे. सूचनांचे प्रकटवाचन व मूकवाचन करणे.

कार्यपद्धती - सार्वजनिक ठिकाणे जसे की बगीचा, सिनेमागृह, बाजार, सार्वजनिक शौचालय, मैदाने, पर्यटन स्थळे, गड व किल्ले, विविध प्रदर्शने, अग्निशामक सेवा, बस स्टेशन, रेल्वे स्टेशन या ठिकाणी कशा प्रकारच्या व कोणकोणत्या सूचना असतात याची चर्चा करावी. याच्या नमूना शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर सादर करावा. सूचनाचे प्रकट वाचन करून दाखवावे. आपला परिसर व गाव यात, वेगवेगळ्या ठिकाणी जसे की दवाखाना, ग्रामपंचायत, उपासना ठिकाणे, सायकल दुकान, किराणा दुकान, पोस्ट ऑफिस या ठिकाणी असलेल्या सूचनांचे विद्यार्थ्यांना निरीक्षण व प्रकटवाचन करण्याची संधी द्यावी. त्या सूचना वहीत लिहून आणावयास सांगाव्यात. शाळेतील सार्वजनिक ठिकाणी जसे क्रीडांगणे, स्वच्छता गृह, पिण्याचे पाणी, बगीचा, प्रयोगशाळा, या ठिकाणी कोणकोणत्या सूचना असतील याचे विद्यार्थ्यांना स्वतः लेखन करून वाचन करण्यास सांगावे.

सक्षम बनू या

कृती - कविताचे ताल लय व सुरात प्रकट वाचन करणे.
कार्यपद्धती - कविता या भाषिक सौंदर्याचे उत्कृष्ट नमुना असतात. यात फार मोजक्या शब्दात मोठा आशय लपलेला असतो. कविताचे प्रकट वाचन व मूकवाचन करायला सांगावे. कवितेची मध्यवर्ती कल्पना व तिचा आशय काय आहे ? हे विचारावेत.

त्याच प्रमाणे कवितात वर्णन केलेले स्थळ, काळ, नवीन शब्द यासंबंधी प्रश्न विचारावे. यासाठी पाठ्य पुस्तकातील व व्यतिरिक्त विविध कविता संग्रह मुलांना उपलब्ध करून द्यावेत.

चला सराव करू या

कृती - विविध विषयावरील स्वतः लिहिलेल्या निबंधांचे वाचन करणे.
कार्यपद्धती - निबंधाचे विविध नमुने संग्रहित करून त्याचे विद्यार्थ्यांसमोर वाचन करावे. निबंधात प्रस्तावना, सुसंगत स्पष्टीकरण व समर्पक शेवट हे महत्त्वपूर्ण घटक असतात हे समजून द्यावे. निबंधात आलेले नवीन शब्द, म्हणी, वाक्प्रचार हे विद्यार्थ्यांच्या आवर्जून लक्षात आणून द्यावे. त्याच प्रमाणे आवश्यक तिथे वापरलेली विरामचिन्हे व त्याचा अर्थ याबाबतही चर्चा करावी. आता विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या विषयावर निबंध लेखन करण्यास सांगावे व त्याचे प्रकट वाचन करून घ्यावे.

कल्पक होऊ या

कृती - भेटवर्णन, प्रवासवर्णन याचे प्रकट वाचन करणे.
कार्यपद्धती - आंतरजालावर छोटी छोटी प्रवास वर्णने आहेत. ती विद्यार्थ्यांसमोर ठेवावीत. त्याचे प्रकट वाचन घ्यावे. वाचनानंतर त्यांचे आकलन तपासण्यासाठी काही प्रश्न विचारावेत. त्याच प्रमाणे मुले आपल्या परिसरात नेहमीच भेट देत असतात. यावेळी त्यांना जाणीवपूर्वक परिसरातील किराणा दुकान, सायकल दुकान, चप्पल दुकान, कापड दुकान यांना भेट देऊन त्याचे वर्णन लिहायला लावावे. वर्णन लिहितांना भेटीत काय काय पाहिले याचा अंतर्भाव करायला सांगावा. ह्या वर्णनाचे प्रकटवाचन घ्यावे. शेवटी वर्णनावर आधारित काही प्रश्न विचारून मुलांचे आकलन तपासावे.

पूरक साहित्य स्रोत

आंतरजाल, निबंधमाला, कवितासंग्रह, पर्यटन मासिके. क्षेत्रभेट द्वारे नोंदी, सहावीचे पाठपुस्तक.


चाळीसावा दिवस

क्षेत्र – लेखन

कौशल्य:- स्व-अभिव्यक्ती लेखन

अध्ययन निष्पत्ती - विविध विषय आणि उद्देशांसाठी लिहिताना उपयुक्त शब्द, वाक्प्रचार, म्हणी, विरामचिन्हे, इतर व्याकरणिक या घटकांचा उपयोग करतात. उदा. काळ, क्रियाविशेषण, जोडशब्द इत्यादींचा उपयोग करतात.

जाणून घेऊ या



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. अवघ्या जगाचा पोशिंदा शेतकऱ्यांबदद्ल आपणास काय वाटते ते लिहायला सांगावे. याप्रमाणे उपलब्ध इतर चित्रांचा वापर करून विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगून विविध मुद्दयांवर लेखन करायला सांगावे. मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत चित्र असावे.)

सक्षम बनू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. हे चित्र पाहून त्यांच्या मनात जे विचार आले ते शब्दात मांडायला सांगावे. म्हणी, वाक्प्रचार, क्रियाविशेषण व जोडशब्दाचा उपयोग नक्की करायला सांगावा.)

चला सराव करू या



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून आपण कोणती काळजी घ्यावी हे लिहायला सांगावे.)

कल्पक होऊ या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्यावी.
- मी कृषिमंत्री झालो/झाले तर... कल्पना करा. तुम्ही शेतकऱ्यांना कोणकोणत्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणार? आपले विचार लिहून काढा.

पूरक साहित्य स्रोत

आंतरजाल, चित्रे, पर्यटन मासिके. शब्दकोश, सहावीचे पाठपुस्तक.


एकेचाळीसावा दिवस

क्षेत्र – लेखन

कौशल्य:- स्व अभिव्यक्ती लेखन

अध्ययन निष्पत्ती - वेगवेगळ्या संवेदनशील विषयांबाबत उदा. जाती, धर्म, वर्ण, लिंग, परंपरा, रूढी, लिखित स्वरूपात तार्किक विचार अभिव्यक्त करतात.

जाणून घेऊ या



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. हे चित्र पाहून आपल्या मनात जे विचार आले त्याबद्दल चर्चा करायला सांगावी. आपल्या परिसरात लहान मुलांसाठी जन्माला आल्यापासूनच कोणकोणत्या रूढी परंपरा आहेत याचा विचार करा व ते लिहून काढायला सांगावे. मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत चित्र असावे.)

सक्षम बनू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून विद्यार्थ्याना बोलते करावे, विचार प्रवृत्त करावे. आपल्या घरी मोठ्या व्यक्तींबरोबर चर्चा करून याबद्दल माहिती करून घ्या. मिळालेल्या माहितीनुसार रुढी, परंपरा या मुला मुलींना वेगवेगळ्या आहेत का? याची यादी तयार करायला सांगावी.)

चला सराव करू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्यावी.)

विविध सणवार, उत्सव साजरा करताना विविध प्रकारच्या रूढी, परंपरा, जाती धर्मानुसार वेगवेगळ्या असू शकतात. आपल्या परिसरातील आपल्या आवडत्या सणाबद्दल चर्चा करून माहिती लिहून काढण्यास सांगावे.

कल्पक होऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध देशांतील महत्त्वाचे सण याबद्दल माहिती लिहायला सांगावी.

पूरक साहित्य स्रोत

जात, धर्म, रूढी, परंपरा यांच्या विविधतेवर आधारित युट्यूब वरील व्हिडिओज, ऐतिहासिक पुस्तके .

बेचाळीसावा दिवस

क्षेत्र-भाषाभ्यास(व्याकरण)
कौशल्य- लेखन
संबोध- शुद्धलेखननियम

अध्ययन निष्पत्ती- ६ वी - व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात
उदा.शुद्धलेखनाचे नियम
७वी-भाषेतील बारकावे /लेखन नियम व्यवस्था तसेच नवीन शब्दांचा प्रयोग करतात.

जाणून घेऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शुद्धलेखनासाठी ५ ओळींचा उतारा श्रुतलेखनासाठी द्यावा. नंतर फळ्यावर तो मजकूर लिहून सहाध्यायींकडून तपासून घ्यावा. चुकीचे शब्द दुरुस्त करण्यास सांगावे. तसेच लेखन अचूक करण्यासाठी लेखनाचे काही नियम असतात यावर विद्यार्थ्यांसोबत चर्चा करावी.)

सक्षम बनू या

(शिक्षकांनी एकाक्षरी शब्दांचे लेखन व ऱ्हस्व- दीर्घ शब्द यांचे लेखन उदाहरणासहित घ्यावे त्यासंबंधी पुढील नियम सांगावेत.)

१.'नि' हा एकमेव एकाक्षरी शब्द सोडता इतर एकाक्षरी शब्द दीर्घ लिहितात.

उदा. तिची नि माझी पक्की मैत्री झाली.

२. आणि, परंतु शब्द वगळता मराठी भाषेत शब्दांच्या शेवटी येणारे 'इ- कार' व 'उ-कार' दीर्घ लिहितात.

चला सराव करू या

(शिक्षकांनी वरील नियमांचे शब्द पाठातून किंवा उपलब्ध मजकुरातून शोधून काढण्यास सांगावे.)

१.'नि'हा एकमेव एकाक्षरी शब्द सोडता इतर एकाक्षरी शब्द दीर्घ लिहितात.

२. आणि,परंतु शब्द वगळता मराठी भाषेत शब्दांच्या शेवटी येणारे 'इ- कार' व 'उ-कार' दीर्घ लिहितात.

(आवडीच्या मजकूरातील एकाक्षरी शब्द शोधून लिहिण्यास सांगावा.)

कल्पक होऊ या (आव्हाने)

(शिक्षकांनी फळ्यावर एक उतारा द्यावा व विद्यार्थ्यांना त्यातील अशुद्ध शब्द शोधून तेथे शुद्ध शब्द मांडण्यास सांगावेत. ते शुद्ध शब्द शब्दकोशात शोधण्यास सांगून खात्री करण्यास सांगावी.)

पूरक साहित्य स्त्रोत

- इयत्ता ६ वी मराठी पाठ्यपुस्तक, बालसाहित्य , वयोगटानुसार लिखित/छापील मजकूर, मराठी शब्दकोश, शुद्धलेखन नियम पुस्तिका

त्रेचाळीसावा दिवस

क्षेत्र – लेखन

कौशल्य:- स्व अभिव्यक्ती लेखन

अध्ययन निष्पत्ती - स्वतः चे अनुभव स्वतः च्या भाषाशैलीत लिहितात.

जाणून घेऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्र बघून काय विचार आले ते लिहायला सांगावे.)



(याप्रमाणे उपलब्ध इतर चित्रांचा वापर करून विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगून विविध मुद्द्यांवर लेखन करायला सांगावे. मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत चित्र असावे.)

सक्षम बनू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या रोजच्या जीवनावर आधारित दैनंदिन लिहिण्याचा सराव द्यावा.)

- आजच्या दिवशी मला सगळ्यात जास्त आवडलेली गोष्ट
- मला आज खटकलेली गोष्ट

असे इतर वेगवेगळे मुद्दे सुचवावे.

चला सराव करू या



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध व्यवसायाबद्दल स्वतः च्या शब्दात वर्णन करायला सांगावे. विविध बाबींवर लेखनाचा सराव द्यावा. विविध प्रकारच्या व्यवसायाबद्दल बद्दल माहिती मिळवण्यासाठी प्रश्न लिहण्याचा सराव द्यावा. स्थानिक परिस्थिती नुसार व्यवसायाची निवड करण्याचे स्वातंत्र्य द्यावे.)

कल्पक होऊ या (आव्हाने)



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे.)

समजा जिल्ह्याच्या क्रिडा स्पर्धेत तुमच्या शाळेचा सहभाग होता.त्याठीकाणी तुम्हाला काय काय अनुभवायला मिळाले तो विचार करा आणि लिहा. अशी सूचना द्यावी. सरावासाठी परिसरातील, ओळखीचे चित्र घेऊ शकता.

पूरक माहित्य स्त्रोत

प्रसंग चित्रे

चव्वेचाळीसावा दिवस

क्षेत्र – लेखन

कौशल्य:- स्व अभिव्यक्ती व स्वलिपी लेखन

अध्ययन निष्पत्ती – ६ वी- मराठी भाषेतील विविध साहित्य सामुग्री वृत्तपत्र, पत्रिका कथा माहिती देणारी साधने इंटरनेटवर प्रसिद्ध साहित्य समजपूर्वक वाचतात आणि त्यावरून आपली आवडनिवड स्वभाषेत किंवा ब्रेल लिपीत व्यक्त करतात.

जाणून घेऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उतारा वाचून दाखवावा. उतारा पुन्हा एकदा वाचायला सांगावा. हा उतारा त्यांच्या मनात काय विचार आले ते स्वत: च्या शब्दात लिहून काढायला सांगावे. उतारा, कविता मुलांच्या अनुभव विश्वाशी निगडीत असावी.)

सक्षम बनू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उताऱ्यावर आधारित प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलते करावे, विचार प्रवृत्त करावे. स्वत:च्या एखाद्या विषयावर अनुभव लेखनाचा सराव द्यावा.

चला सराव करू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वत: चे विचार विविध साहित्य सामुग्री वाचून लिहायला सांगावे उदा. आपल्या महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तींपैकी तुला आवडणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या तुला आवडणाऱ्या विविध बाबींवर माहिती लिही. त्याकरिता तू पुस्तक, टिव्ही, इंटरनेट वर उपलब्ध साहित्य बघू शकतो.)

कल्पक होऊ या (आव्हाने)



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. वरील चित्र पाहून त्यांच्या मनात काय विचार आलेत ते लिहून काढायला सांगावे. महिला दिनानिमित्त कार्यक्रमात आपल्या परिसरातील महिला बचत गटातील महिलांना तुम्ही काय प्रश्न विचारणार याची यादी तयार करायला सांगावी.)

पूरक साहित्य स्रोत

मराठी भाषेतील विविध साहित्य सामुग्री वृत्तपत्र, पत्रिका कथा माहिती देणारी साधने इंटरनेटवर प्रसिद्ध साहित्य.

प्रश्न: १. खालील चित्राचे निरीक्षण करून दिलेल्या मुद्द्यांवर तुझे मत व्यक्त कर. **(गुण-५)**


(शिक्षकांनी मुलांना प्रत्येक मुद्द्यावर किमान १ मत व्यक्त करण्यास सांगावे.)



मुद्दे -
१.व्यवसाय
२. चित्रातील परिसर
३.चित्रातील संभाषण
४.चित्रातील व्यवसायाचा जिल्हा
५.समुद्रातून मिळणाऱ्या वस्तू/ गोष्टी

प्रश्न: २. ऐक व लिही . (शिक्षकांनी जोडाक्षरयुक्त दोन ओळी श्रुतलेखनासाठी सांगाव्यात.) **(गुण-२)**

प्रश्न: ३. कोडे पूर्ण करा. **(गुण-३)**



उभे शब्द- १.क्रियापदाचा एक प्रकार
२. प्रश्नार्थक सर्वनाम
आडवे शब्द – १. 'खूप मोठे शरीर' यासाठी वापरले जाणारे विशेषण
२. खाशाबा जाधव हे कोणता खेळ खेळण्यासाठी प्रसिद्ध आहेत.

प्रश्न: ४. दिलेल्या ओळीशी यमक जुळणारी एक ओळ तयार करून लिहा. **(गुण-२)**

रिमझिम रिमझिम पाऊस धारा

प्रश्न: ५. पुढील वाक्यामध्ये विरामचिन्हांचा योग्य वापर करून वाक्य पुन्हा लिहा. **(गुण-२)**

काही सांगू नका यानंतर असली मुलं कार्यालयात आलेली मला चालणार नाहीत समजले साहेब म्हणाले

प्रश्न: ६. शाळा प्रत्यक्ष सुरू झाल्यावर शाळेत पहिल्या दिवशी कोणाशी व काय बोलणार याची कल्पना करून संवाद रूपात लिही. (शिक्षकांनी मुलांना दहा ओळींचा संवाद लिहिण्यास सांगावा.) **(गुण-३)**

प्रश्न: ७. पुढील वाक्यांचे काळ बदलून लिही. **(गुण-२)**

अ) जॉन जेवत आहे. (पूर्ण भूतकाळ)

ब) खूप पाऊस पडेल. (साधा वर्तमानकाळ)

प्रश्न: ८. अ) दवाखान्यात दिसणाऱ्या कोणत्याही २ सूचना लिहा. **(गुण-२)**

ब) खालील वाक्यातील चुकीचे शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिही.

- मी येणार होते परंतू माझी बस चुकली.

प्रश्न: ९. खालील जाहिरात वाचून सोबत दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. **(गुण-४)**



१. जाहिरातीमधील कागदी पिशव्या वापरण्यास योग्य आहेत हे कोणत्या शब्दावरून समजते ?
२. स्वच्छते संबंधी एक घोषवाक्य तयार करा.
३. ४०% सूट म्हणजे १०० रुपयांवर किती रुपयांची सुट मिळेल?
४. पर्यावरणपूरक अशा आणखी कोणत्या प्रकारच्या पिशव्यांचा वापर करता येईल?

प्रश्न: १०. दिलेल्या चित्रावरून गोष्ट तयार करून लिही. गोष्टीला योग्य शीर्षक दे. **(गुण -५)**

(शिक्षकांनी मुलांना दिलेल्या चित्राच्या आधारे १० ते १२ ओळींमध्ये गोष्ट लिहिण्यास सांगावी.)

